ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी,
कृतिशीलता
जोपासणारे मासिक !

छात्र प्रबोधन

सौर वैशाख, शके १९३५ । वर्ष १३ अंक ८
मूल्य रुपये पंधरा

Tag No.
CP130810
ActiveLink
व्हिडिओ पाहा

॥महाराष्ट्र सूक्त॥

ही भूमी महाराष्ट्राची
ही भूमी संतजनांची
ही माय माऊली, छत्र साऊली, भूमी पुण्याईची ।।ध्रु.।।

हे पर्वत, हिरवी राने
सरितांचे मंजुळ गाणे
हा विशाल सागर गाज ऐकवी, अदम्य सामर्थ्याची ।।१।।

ही सुफलित येथे माती
कणसात लगडले मोती
हा सह्यगिरी रांगडा बोलतो, वचने पराक्रमाची ।।२।।

नररत्ने नारीशक्ती
ज्ञानाचे दीप उजळती
हा विकासतारा सर्व भेदितो, पटले अंधाराची ।।३।।

भावभक्तीचा पूर
अभिमान साठवी ऊर
उधळतो अश्व चौखूर
प्रगतीचे घुमती सूर
हे महान अमुचे राष्ट्र देतसे, साक्ष बंधुभावाची ।।४।।

– चारुता प्रभुदेसाई

छात्र प्रबोधन

सौर वैशाख, शके १९३५। वर्ष १३ अंक ८

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २५० वा अंक, वर्ष २१ अंक १०

प्रकाशन दिनांक - ११ वैशाख, शके १९३५/१ मे २०१३

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

• अंतरंग •

२. **संवाद** - महेन्द्र सेठिया

३. कथा ... **मामाचा मोर** - वाच. लीला दीक्षित

६. कला रसास्वाद... **दोस्ती शिल्पकलेशी...** - वाच. मालती आगटे

९. ललित... **अंदमानचा सेल्युलर जेल - क्रांतिकारकांचे तीर्थक्षेत्र !!** - वाच. नलिनी गुजराथी

१२. माहितीपर... **गेमिंगच्या जगतात...** - सत्यजित बाजी - पंकज यादव

१५. कथा ... **बादल** - अनु. माधव शाळिग्राम

१९. विज्ञान तंत्रज्ञानातील कल्पकता... लेखांक-२ **चला वस्तूंचे गुणधर्म बदलून बघूया !** - वाच. नलिनी गुजराथी

२१. मुलांचे पान... **अविस्मरणीय भेट !** - चि. श्रीरंग टोके

२३. प्रासंगिक... **पाण्यासाठी दाही दिशा !** - रोहन पानसे

२५. चित्रकथा... **वेगळं कबुतर** - ईशान पुणेकर

२९. निर्णयातील स्वावलंबन...५ **निर्णयाचे स्वावलंबन जीवनाचे स्वावलंबन** - वाच. उषा खिरे

३२. **माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'**

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य... **महाराष्ट्र सु त** - चारुता प्रभुदेसाई

याशिवाय - अनुभवसंपन्न आणि आनंददायी सुट्टीसाठी व्य तिकार्ये (११), कविता...आनंद -विनीता तेलंग (१४), कर्तव्याची जाण (२०), गिरिभ्रमण सहल (३१)

पानाखालील तळटिपेतील माहितीपर ओळी लेण्या आणि गड-किल्ले यांविषयी आहेत | Tag No. CP130814 ActiveLink | **लेणी-किल्ले व्हिडिओ पाहा**

मुखपृष्ठाविषयी - एप्रिल-मे महिना म्हणजे शिबिरांचा सुकाळ! या शिबिरांच्या भाऊगर्दीत 'आपण न की कोणत्या शिबिराला जावे,' असा संभ्रम दाखवणारा मुलांचा प्रतिनिधी एकीकडे आहे, तर दुसरीकडे या सुट्टीत आपला छंद मु तपणे जोपासणारी मुले आणि त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून जाणारा आनंद दिसतो आहे.

- गिरीश सहस्रबुद्धे, 1000scape@gmail.com

♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦
महेन्द्र सेठिया

♦ कार्यकारी संपादक ♦
शिल्पा कुलकर्णी

♦ संपादक मंडळ ♦
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

♦ मुखपृष्ठ व आतील चित्रे ♦
गिरीश सहस्रबुद्धे

♦ संपर्क पत्ता ♦
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

संकेतस्थळ
www.chhatraprabodhan.org

ई-मेल
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

ऐका ऽ हो ऐका ऽऽ

'छात्र प्रबोधन' मधील साहित्याला 'ऑडिओ-व्हिडिओ' ची पूरक जोड !!
संगणकावर पाहा/ऐका
तपशीलासाठी -पृष्ठ क्र. **५** वर पाहा.
सौजन्य : श्रीनिवास कुलकर्णी
राहुल भानोसे, सुमेध फाटक

मासिकाची वर्गणी : वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०, त्रैवार्षिक: ₹ ५००, दशवार्षिक: ₹ १,५००.
या अंकाची किंमत : ₹ १५
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा, घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही र कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

मार्गी कंटक तुला बोचतील, ठेचा तैशा अनेक बसतील। प्रसंग नाना निराश करतील, भिऊ नको तू परी।।

। किल्ले पाहा... किल्ले अलंगगड, कुलंगगड, मदनगड - जि. नाशिक, बुलंद, चढाईस अवघड असे त्रिकूट ।

संवाद

समाजिक कामांमध्ये सहभागी होण्याचे संकल्प करणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,

'सुट्टीची धमाल अन् अनुभवांची कमाल' यातला आनंद तुम्ही सर्वजण घेत आहात ना! आत्तापर्यंत सुट्टी नुसतीच आळस-कंटाळा-'टाइमपास' करत घालवली असेल, तर अजूनही महिनाभर सुट्टी शिल्लक आहे. तेव्हा काहीतरी नवीन, दीर्घकाळ लक्षात राहील, आपण थोडेसे 'मोठ्ठे' झालो याची जाणीव होईल, असं काहीतरी ठरवून या सुट्टीत करा ना!

काही दिवसांपूर्वी 'छात्र प्रबोधन'ची वाचक, शिबिरार्थी आणि बोरीवली केंद्राची युवती कार्यकर्ती कु. अपूर्वा राणे, तिची पदवी परीक्षा देऊन 'ज्ञान प्रबोधिनी'च्या 'ग्रामविकसन' क्षेत्रात एक वर्षभर पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करण्यासाठी पुण्यात दाखल झाली; याचा मनापासून आनंद झाला. तिचं व तिच्या आई-बाबांचंही मनापासून अभिनंदन! दोन वर्षांपूर्वी अशीच 'छात्र प्रबोधन'ची वाचक, शिबिरार्थी आणि डोंबिवली केंद्राची युवती कार्यकर्ती कु. दीपाली गोडसे हिनेही पदवी परीक्षा देऊन प्रबोधिनीच्या 'नागरी वस्ती विकास' प्रकल्पात पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून वर्षभर उत्तम काम केलं. गेल्या २० वर्षात 'छात्र प्रबोधन'च्या वाचक, शिबिरार्थी युवक-युवतींपैकी सहा युवक-युवतींनी वर्ष-दोन वर्षं पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून प्रबोधिनीच्या विविध विभागांमध्ये उत्तमरितीनं काम केलं. याशिवाय अन्य सामाजिक संघटनांमध्येही आपल्या काही वाचक, शिबिरार्थींनी पूर्ण वेळ काम केलं आहे, तर काहींनी २-४-६ महिने पूर्णवेळ कामाचा अनुभव घेतला आहे. निरपेक्षपणे समाजाच्या उपयोगी पडण्याचे, समृद्ध करणारे अनुभव या काळात त्या सर्वांनी घेतले. त्यांचे मनापासून कौतुक!

'छात्र प्रबोधन'च्या वाचकांमधून यापुढे मोठ्या संख्येने युवक- युवतींनी पदवीनंतर १-२-५ वर्षे सामाजिक कार्यात पूर्णवेळ सहभागी व्हायला हवं आहे. शिकत असलेल्या तुम्ही सर्व प्रबोधकांनी आत्तापासून असा संकल्प करायला हवा. 'पदवीचं शिक्षण पूर्ण झाल्यावर आयुष्यातला काही काळ, किमान १-२ वर्षे तरी सामाजिक संघटनांमध्ये मी पूर्ण वेळ काम करण्यासाठी राखून ठेवीन,' असं आत्तापासून तुम्ही मनाशी पक्कं करायला हवं. स्पर्धेच्या भोवऱ्यात गरागरा फिरण्याचा अन् पैशाच्या मागं धावणाऱ्या जगामध्ये असं मनात आणणं सुद्धा अवघड आहे, हे खरंय! पण स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य मिळविण्यासाठी हजारो तरुणांनी असा वेळ दिला होताच ना! म्हणून तर आपल्याला स्वातंत्र्य मिळालं. मग त्यांच्याबद्दलची कृतज्ञता मनात बाळगत, 'स्व' राज्याचं 'सु'राज्यात रूपांतर करण्यासाठी, खऱ्या अर्थानं 'मेरा भारत महान' बनविण्यासाठी, आपण थोडा तरी वेळ नको का काढायला? 'जाता जाता, जमेल तसं' नाही, तर ठरवून! आयुष्यातला महत्त्वाचा, उमेदीचा, उत्साहाचा, सामर्थ्याचा काळच या कामासाठी द्यायला हवा आहे! असा वेळ दिल्यामुळे आयुष्यात आपण इतरांच्या मागे पडू, स्पर्धेत टिकणार नाही, अपेक्षित पैसे कमावता येणार नाहीत अशी भीती बाळगण्याचं काहीच कारण नाही. असे पूर्णवेळ काम केलेले युवक-युवती, त्यांच्या दैनंदिन जीवनात तर यशस्वी झालेले आहेतच; पण त्याचबरोबर इतरांसाठी जगण्यातला आनंदही मिळवताहेत. स्वत:मध्ये असलेल्या विविध क्षमतांची, सामर्थ्याची खरी जाणीव त्यांना अशा पूर्णवेळ कामातूनच झाली आहे.

तेव्हा पदवीनंतरचे संकल्प आत्ता मनात रुजवायचे अन् त्यासाठी आत्तापासून अशा सामाजिक कार्यामध्ये छोटी-मोठी कामे करण्यासाठी सुट्टीतले काही दिवस राखून ठेवायचे. त्यातून आपले संकल्प अधिक बळकट करायचे.

प्रबोधिनीच्या अनेक कार्यकर्त्यांच्या सहवासामुळे मलाही असं करता आलं. शाळा-महाविद्यालयात शिकत असताना केलेला संकल्प, माझी अभियांत्रिकीची पदवी झाल्यावर मी दोन वर्षे पूर्णवेळ काम करून, पूर्ण करू शकलो, याचा आनंद वाटतो. तो काळ माझ्यासाठी खरोखरीच आयुष्यभराची शिदोरी देणारा, दिशा देणारा ठरला.

तुमच्यापैकी अनेकांच्या मनात पूर्णवेळ काम करण्याचे संकल्प रुजोत यासाठी शुभेच्छा! 'छात्र प्रबोधन' त्यासाठी तुम्हाला सतत आठवण आणि मदत करत राहील.

सस्नेह तुमचा,

(महेन्द्र सेठिया)

कलांवरती प्रेम करावे, साहित्याचा ध्यास धरावा। अभ्यासाचा विचार आपुल्या, देहामध्ये मुरवून घ्यावा।।

। किल्ले पाहा... रतनगड - उंची ४२५० फूट, जि. नाशिक, अखंड खडकात खोदून केलेला त्र्यंबक दरवाजा ।

प्रायोजक - व्ही. व्ही. आर्किटे ट प्रा. लि., पुणे.

मामाचा मोर

– वाच. लीला दीक्षित

मे महिन्याची सुट्टी तुम्हां मुलांसाठी नवं काही शिकण्यासाठीची जणू पर्वणीच! त्या सुट्टीची मजा आंबा-फणसाच्या मोसमात जर कोकणात लुटली, तर मग सोन्याहून पिवळं...

या कथेतल्या शरद-शुभदानी सुट्टीत कोकणात केलेली धम्माल वाचूया सोबतच्या कथेत...

शरद आणि शुभदा दोघंही खूष होती. मे महिन्याच्या सुट्टीत सुमन आत्याबरोबर कोकणात आजोबांकडे जायचं निश्चित झालं होतं. पुण्यात शुभदा आणि शरदला कंटाळा येई. आईबाबा कामावर जाणार ते सायंकाळी परतणार. आजी आपल्याला सोडून देवाघरी गेली म्हणून दोघांच्याही डोळ्यांत पाणी दाटे. हस्तकला वर्गाचा दोघांना कंटाळा आला होता. सारख्या त्याच त्याच गोष्टी. मामाकडे मजा असते. 'आजोबा यंदा दोघांना बांबूची बैलगाडी शिकवणार आहेत', असं सुमन आत्या आईला सांगत होती. कोकणात मामाबरोबर फिरायला मोठी मजा येते.

शेवटी तो दिवस उगवला. शाळेला सुट्टी पडली. शरद आणि शुभदानं आईला निक्षून सांगितलं, ''यंदा १४ जूनला शाळा सुरू होणार आहे, आम्ही पाऊस सुरू झाल्यानंतरच येणार. पावसात डोंगरावर नाचणारे मोर आम्हाला पाहायचे आहेत.''

सुमन आत्याबरोबर मुलं मामाच्या घरी दाखल झाली. आजीच्या आनंदाला तर उधाणच आलं होतं. 'मे' ची सुट्टी म्हणजे आंबा फणसाचे दिवस. एस. टी.तून घरी आल्यावर आजीनं सर्वांपुढे फराळाचं ताट ठेवलं. कैरीची डाळ, सांजोऱ्या, खोबऱ्याच्या वड्या आणि नंतर शहाळ्याचं मधुर पाणी! आजोबा अंगणात बांबूच्या पातळ पट्ट्या तासत होते. नातवंडांना बैलगाडी शिकवायची होती ना?

दिवस मजेत जात होते. मामाबरोबर सकाळी शेतात जावं. तोरणे, जांब, अळू, करवंद असा मेवा खावा आणि घरी आल्यावर मस्त आमरसाचं जेवण झोडावं. एक दिवस आजोबांनी शरदला 'गोट्या' अशी हाक मारली.

''आजोबा माझं नाव शरद आहे, गोट्या काय हो म्हणता मला?'' शरदचा तक्रारीचा सूर.

''शरदराव आता नाव बदलावं लागणार तुमचं. गुटगुटीत म्हणजे गोट्याच ना?'' आजोबा कौतुकानं म्हणाले...

Tag No. CP130820 ActiveLink | लेखिकेची मुलाखत पाहा

आज लाभले पंख तुला गे, गरुडाचे सोनेरी। संकटांचे पर्वत लंघून, घेई दूर भरारी।।

। किल्ले पाहा... साल्हेर - उंची ५,१५० फूट, गुजरात व नाशिक सीमेवर, महाराष्ट्रातील सर्वात उंच किल्ला।

प्रायोजक – कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे.

सुट्टीत आजोबांकडून बैलगाडी शिकून झाली. शरद मोडी लिपीसुद्धा शिकला. अगदी लिहायला आणि वाचायला देखील!

''गोट्या... अरे चुकलोच की! शरदऽ, तुझा मोडी भाषेचा जिव्हाळा पाहून मी तर एकदम खूष. कसं काय बुवा तुला मोडीचं वेड लागलं?''

''त्याचं काय आहे आजोबा, पेशव्यांचे सचिव हरिपंत फडके, या गावचेच ना?''

''हो. त्यांचा वाडा होता ना इथे,'' आजोबा.

''म्हणजे त्या वाड्यात त्यांची मोडी कागदपत्रे...''

''अरे तो वाडा केव्हाच मोडला. त्याच भ कम जोत्यावर खरे काकांचं दार आहे.''

''आजोबा त्यांच्या भुयारात मोडी कागदपत्रांचा साठा असेल नं?''

आजोबांनी विचार केला. 'कल्पनेच्या राज्यात शरद आहे त्याला राहू द्या तसेच!'

''आजोबा, ते भुयार मी शोधणार, कागदपत्रं शोधणार, वाचणार, मग बातमी येईल. जुन्या वाड्यात हरिपंत फडके यांचे मोडी दप्तर...,'' शरदचे डोळे चमकले.

''शरदराव, जरा भानावर या. आता पाऊस सुरू होणार आता एक दोन दिवसात.''

''तुम्हाला कसं कळलं?''

''इथे हवामान खातं पावसाचा अंदाज नाही सांगत. निसर्ग सांगतो. समुद्र खवळलांय, कुंपणीवर सरड्यांच्या डुकल्या लाल झाल्यात.''

''आजोबा, तरी आम्ही जाणार नाही. आम्हाला नाचणारे मोर पाहायचेत. शाळा एक आठवडा उशीराच आहे.''



होणार नाही कुणी दिवा, मिळणार नाही उबदार हात। तुझी तुलाच चालावी लागेल, पायाखालची एकाकी वाट।।

। किल्ले पाहा... धोडप - उंची ४,७६१ फूट, जि. नाशिक , अजिंठा रांगेतील सर्वात उंच, नाशिक...कळवण...वडाळा।

प्रायोजक – श्री. अजित भिडे (डायरे टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.) पुणे ☎ २५३८०४०६

पावसाळा सुरू झाला. डोंगरानं मखमली हिरवं वस्त्र नेसलं. डोंगर उतारावर मोर उतरू लागले. त्यांची संख्या वाढत गेली की आपला लखलखीत पंखा पसरून ते नाचू लागत. कोवळ्या उन्हात हिरव्या पार्श्वभूमीवर त्यांचे पंखे वेगळ्याच सौंदर्यानं खुलून दिसत. त्यांच्या पायात लांडोरी लुडबुडत राहात.

डोंगराच्या पायथ्याशी वाहता ओढा होता. त्याला तटून कुंपण होतं. कुंपणीला नुकतेच नवीन मोखे पुरले होते. बांबूचे ते मोखे अजूनही हिरवेगार होते. मोराला उंच उडता येत नाही. एक मोर उडाला तो बसला बांबूच्या मोख्यावर. पातळ धसकट त्याच्या पंखालगत रुतून बसलं. पंखाखालून जमिनीवर र ताचे थेंब गळू लागले. मोराला सुटता येईना. मुलांनी गलका केला. मामा, मामी, आजोबा, आजी, सारीच अंगणात धावली. हरचंद गडी आणि मामा पुढे सरसावले; पण मोर जवळ येऊ देईना. लांब मान वळवून तो चोच मारी. हरचंदच्या हाताला त्याच्या चोचीनं ओरखडा उठला. करावं तरी काय? पण आजी हुषार!

''विश्वनाथ, असं कर, मोर अडकलाय. त्याला सुटताही येत नाही. मोराच्या शेजारी थोडं उंच मचाण बांध.'' आजीनं फर्मान सोडलं.

मामाला पुढचं काही सांगावं लागलं नाही. त्यानं हरचंदकडून मचाण बांधलं. मचाणावर एक नारळाची चकचकीत भेली बांधली. भेली म्हणजे खोबरं खरवडल्यावर आतून बाहेरून चकचकीत केलेली नारळाची वाटी. त्याला खाली एक भोक पाडलं. निर्गुडीचा पाला, हळद आणि लोणी एकत्र करून ते पातळ रोगण त्या भेलीत ओतलं. भोकातून ते रोगण जखमेवर हळूहळू थेंबानं पडू लागलं. जवळ एका भांड्यात पाणी आणि वाटीत धान्य ठेवलं. संध्याकाळपर्यंत मोर जरा तरतरला. र त जरा कमी झालं. असं दोन दिवस चालू होतं. मामी सकाळी उठून औषधाचं ताजं रोगण वाटीत ओतायची आणि हरचंद दाणापाणी पाहायचा.

गावातील मोठी माणसंही मोर पाहून गेली. मुलांना तर काय तोच नाद! जाता येता डोकवायचे. मामाचा मोर काय करतोय? तिसऱ्या दिवशी मुलं उठून मोर पाहायला गेली, तर काय मोर उडून गेला होता. मुले धावली.

''मामाऽ मोर उडून गेला.''

''छानच की! तो स्वतंत्र झाला.''

''मामा तू किती कष्ट घेतलेस?'' शुभदा म्हणाली.

''कष्ट काहीच नाही. मी तर हात सुद्धा लावला नाही मोराला,'' मामा हसत म्हणाला.

''खरंच की, मामाचा मोर स्पर्शही न करताच बरा झाला.'' आता शाळेच्या हस्तलिखितात हीच गोष्ट मी लिहिणार. 'मामाचा मोर.'

सर्वांनी टाळ्या वाजवल्या.

– वाच. लीला दीक्षित
द्वारा अरुणा कुलकर्णी
४ अनुवी, ५५ डहाणूकर कॉलनी,
कोथरुड, पुणे – ३८

छात्र प्रबोधनच्या अंकातील शेजारील चौकट ज्या लेखांच्या सुरुवातीला दिली आहे त्या लेखांशी निगडित ऑडिओ/व्हिडीओ इंटरनेटद्वारा आपल्या संगणकावर कसे ऐकावे/पाहावे याच्या सूचना खाली दिल्या आहेत. त्याप्रमाणे कृती करुन लेखांच्या वाचनाबरोबरच पूरक साहित्याचा आनंद घ्या.

Tag No. ActiveLink | ऑडिओ/व्हिडिओ पाहा/ऐका

View multimedia content on your Computer or on the Mobile/Tablet

Instructions to use ActiveLink on PC and Mobile/Tablet:

1. Go to http://www.activel.in **2.** You can use your PC as well as your tablet/mobile (Smartphone).

3. Insert the 'tag number given with the article in Chhatra Prabodhan and **click 'search** for audio/video.

टॅग नंबरसाठी पाहा – मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य, पान क्र. – १, ३, ६, ९, १२

नव्या युगाच्या नव्या कुमारा, टाक पुढे पाऊले। विश्वाचे हे विशाल अंगण, तुझ्याचसाठी खुले।।

। लेणी पाहा... अंकाई - टंकाई - मनमाड, जि. नाशिक, इ. स. ५ ते ११ व्या शतकातील गजारूढ इंद्र, पार्श्वनाथ इ. मूर्ती।

प्रायोजक – श्री. चिंतामणी बने, डोंबिवली.

दोस्ती शिल्पकलेशी...

– वाच. मालती आगटे

मित्रांनो, मी जर तुम्हाला असं म्हणाले की 'तुमच्या आयुष्यात तुम्ही चित्रं काढण्याआधी शिल्पे घडवली आहेत,' तर तुम्हाला माझ्या बोलण्याचं आश्चर्य वाटेल, हो नं?

आठवा बरं तुमचे बालपण! त्या वयात तुम्ही मातीत, चिखलात, वाळूत मनसो त खेळला असणार! खेळता खेळता गंमत म्हणून मातीच्या छोट्या छोट्या वस्तू बनविल्या असणार! उदा. एक मोठा गोल गोळा करून त्यावर त्याच मातीचे छोटे छोटे गोळे चिकटवून सिताफळ बनवले असणार! तुम्ही बनवलेले सिताफळ म्हणजे एकप्रकारे तुम्ही घडवलेलं शिल्पच होय!

चित्रकलेशी तुमची दोस्ती शाळेत झाली असेल. चित्रकलेसारखेच तुम्ही शिल्पकलेशी दोस्ती करायला उत्सुक असाल, तर ते फारसं अवघड काम नाही. कारण चित्र आणि शिल्प या दोन्ही 'दृक्कला' म्हणून ओळखल्या जातात. त्यामुळे दोन्हीमध्ये बऱ्याच गोष्टी समान आहेत. मुख्य म्हणजे या दोन्ही कलांचे मूळघटक सारखेच आहे. ते म्हणजे रेषा, आकार, रंग, पोत, छायाभेद. असं जरी असलं तरी या दोन्ही कलांतील मुख्य फरक म्हणजे, चित्र कोणत्यातरी पृष्ठभागावर काढलं जातं. तर शिल्प कशापासून तरी घडवलं जातं. उदा. माती, दगड, लाकूड, हस्तीदंत, काच, विविध धातू, फायबर ग्लास इ. चित्र द्विमित असतं. तर शिल्पात घनतेला जास्त महत्त्व असतं.

चित्र आणि शिल्पासाठी तीन प्रकारच्या शैली वापरल्या जातात. **१. वास्तववादी २. अलंकारिक ३. केवलाकारी.**

शिल्पाचे दोन प्रकार असतात. **१) उत्थित शिल्प** – सपाट पृष्ठभाग (भिंत, दगड इत्यादींचा) खोदून त्याला उठाव आणला जातो. अशा शिल्पांची एक बाजू सपाट असते. अशी शिल्पे भिंतीवर लावता येतात.

Tag No. CP130823 ActiveLink	शिल्पांचे व्हिडिओ पाहा

२) सर्वतोरचित शिल्प – या प्रकारातील शिल्पे सर्व बाजूंनी घडवली जातात. ते घडवण्याच्याही दोन पद्धती आहेत. अ) अनावश्यक भाग काढून टाकणे ब)थरावर थर देऊन शिल्प घडवणं.

शिल्पकलेशी दोस्ती करण्यासाठी तुम्हाला अजूनही काही प्रश्नांची उत्तरं माहीत असणं आवश्यक आहे. ते प्रश्न असे – **१)** ती कलाकृती कोणत्या काळात घडली? कोणत्या संस्कृतीत घडली? कोणत्या भौगोलिक परिस्थितीत निर्माण झाली? **२)** कलेच्या मूळ घटकांच्या साहाय्यानं कलाकृतीला रचनात्मक सौंदर्य प्राप्त झालं आहे का? **३)** त्या कलाकृतीचं स्वत:चं असं खास वैशिष्ट्य आहे का?

आपल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्यासाठी आपण तीन संस्कृतींची निवड करूया.

१) प्राचीन इजिप्शियन संस्कृती २) प्राचीन ग्रीक संस्कृती ३) प्राचीन भारतीय संस्कृती

प्रत्येकच संस्कृतीला विशिष्ट विचारांची बैठक असते. त्या संस्कृतीत घडलेल्या प्रत्येक कलाकृतीवर त्या विशिष्ट विचारांचा पगडा असतो. आपण निवडलेल्या तिन्ही संस्कृती पूर्णपणे भिन्न विचारांच्या आहेत, कशा ते पाहा.

१. प्राचीन इजिप्शियन संस्कृती – 'मानवाचा आत्मा मृत्युनंतरही ऐहिक जीवन जगत असतो', असे तेथील लोकांनी मानलं. म्हणून त्यांनी मृत व्य तीचं शरीर टिकवण्यासाठी त्यावर प्रक्रिया करून भव्य पिरॅमिडस् बांधले. मृत व्य तीच्या जीवनातील प्रसंग पिरॅमिडच्या भिंतीवर चितारले. याचा अर्थ असा की, इजिप्शियनांनी

बनू उपासक सरस्वतीचे, सेवेने सुखवू तिला। भेदण्यास आकाशाला, मग नित्य कल्पना नव्या।।

। लेणी पाहा... मांगी - तुंगी - सटाणा, जि. नाशिक, इ. स. अकरावे शतक, ७ गुंफा व ३५६ मूर्ती ।

दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा. **प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे.**

मानवाचे मृत्युनंतरचे जीवन प्रतीत करण्यासाठी कलानिर्मिती केली.

२. प्राचीन ग्रीक संस्कृती – ग्रीकांना ऐहिक जीवनात सर्वाधिक गोडी होती. 'सुदृढ शरीराचा मानव,' हाच ग्रीक लोकांच्या दृष्टीनं देव होता. त्यामुळे त्यांनी व्यायामाला खूप महत्त्व दिलं. अनेक प्रकारचे खेळ खेळणाऱ्या खेळाडूंची शिल्पे त्यांनी घडवली. एकूणच ऐहिक जीवन सुंदर बनवण्यासाठी ग्रीकांनी कलानिर्मिती केली.

३. प्राचीन भारतीय संस्कृती – 'साऱ्या सृष्टीचं नियमन करणारी महाश ती म्हणजेच 'ब्रह्म' किंवा 'आत्मा' अंशरूपानं प्रत्येक प्राणीमात्रात असतो. त्या आत्मस्वरूपाला परत जाऊन मिळण्यासाठी आपल्याला शरीर हे एक साधन दिले गेले आहे'; असे भारतीय तत्त्वज्ञान सांगतं. त्यामुळे भारतीय संस्कृतीत जी कलानिर्मिती झाली ती ईश्वरार्पण वृत्तीनं झाली.

संस्कृतीच्या वैचारिक बैठकीप्रमाणंच त्या-त्या देशाची भौगौलिक परिस्थिती, हवामान यांचाही परिणाम कलानिर्मितीवर होत असतो. उदा. इजिप्तची हवा उष्ण व कोरडी आहे. तो कोरडेपणा तेथील लोकांच्या स्वभावातही दिसतो. स्वत:च्या धार्मिक कल्पनांना सोडायला ते तयार होत नाहीत. या पार्श्वभूमीवर त्यांच्या कलेत साचेबंदपणा, ताठरता, गतिशून्यता आली.

ग्रीसची हवा समशीतोष्ण, भरपूर सूर्यप्रकाश, स्वच्छ निळे आकाश, निळा सागर या वातावरणात तेथील लोक उत्साही, साहसी, संशोधक वृत्तीचे आणि मुख्य म्हणजे सौंदर्यप्रेमी बनले. त्यामुळे त्यांची कला लावण्यपूर्ण, अतिशय गतिशील, प्रमाणबद्ध, वास्तवतेचं मनोज्ञ दर्शन घडवणारी घडली. ग्रीक शिल्पकलेत वास्तवता आणि लावण्य यांचा सुरेख संगम झालेला आहे.

भारतात सर्वच गोष्टींची विविधता! उत्तरेला नगाधिराज हिमालय. बाकी तिन्ही बाजूस समुद्र! अनेक पर्वत, नद्यांनी यु त अशी भौगोलिक रचना. अनेक प्रांत, जातीजमाती, पंथ, भाषा, अशी मिश्र संस्कृती. विविध प्रांतीय संस्कृतीच्या कलाकल्पनांना भारतानं सामावून घेतलं. आत्मसात केलं. नवीन कलाशैली निर्माण केली. हे साधत असताना स्वत:ची 'ईश्वरार्पण वृत्ती' सोडली नाही. त्यामुळे भारतीय कला प्रतीकात्मक झाली. भारतीय शिल्पात अलंकारिकता आणि प्रतीकात्मकता ओतप्रोत भरलेली आहे. त्यामुळे भारतीय प्राचीन संस्कृतीत घडवलेली एखाद्या देवतेची प्रतिमा म्हणजे केवळ मानवाची प्रतिमा नाही. वेदांतातल्या अमूर्त तत्त्वज्ञानाचं ते मूर्त रूप आहे. उदा. तंजावरच्या नटराजाची मूर्ती म्हणजे केवळ एका नर्तकाची मूर्ती नसून, ती अज्ञानरूपी राक्षसाला पायाखाली घालून नर्तन करणाऱ्या साक्षात ज्ञानश तीचं ते तांडव आहे.

तुमचा एखादा दोस्त परप्रांतातून किंवा खेड्यातून आला असेल, तर त्याचं बोलणं, चालणं, राहणं, वागणं, वेशभूषा वेगळ्याच ढगांची असते. त्या ढंगाची एकदा आपल्याला माहिती झाली, म्हणजे ती गृहीत धरूनच आपण त्याच्याशी दोस्ती करतो. कारण दोस्तीसाठी आवश्यक असणारा सच्चेपणा त्याच्याठिकाणी असतो. तद्वतच शिल्पकलेशी दोस्ती करताना करावं लागतं.

आता शिल्पकलेचा सच्चेपणा कशात असतो? असा प्रश्न तुमच्या मनात उभा राहिला असणार! तर तो असतो तिच्या मूळघटकात! हे मूळघटक ज्या शिल्पात 'योग्य पद्धतीनं' शिल्पांकित झालेले असतात ते शिल्प सुंदर दिसते. आणि म्हणून आपल्याला ते शिल्प मनापासून आवडतं.

'योग्य पद्धतीनं' म्हणजे काय हे समजण्यासाठी आपण एखाद्या शिल्पाचं थोड यात रसग्रहणच करूया. म्हणजे शिल्पकलेची तुमची दोस्ती अगदी प की होईल!

छात्र प्रबोधन–सौर वैशाख, शके १९३५

शे जारील आकृतीमध्ये जी शिल्पाकृती आहे तिचं नाव आहे **'धर्मचक्र परिवर्तन मुद्रेतील बसलेला बुद्ध!'**

शिल्पाच्या नावावरून तुमच्या

लक्षात आलंच असेल, की या शिल्पात मधोमध जी मानवाकृती आहे ती प्रवचन देणाऱ्या भगवान बुद्धाची आहे. बुद्धानं पद्मासन घातलं आहे. हातांची जी ठेवण आहे तिला 'धर्मचक्र मुद्रा' म्हणतात. बुद्ध प्रतिमेच्या मागे जे भलेमोठे अलंकृत वर्तुळ आहे ते प्रभामंडल म्हणजेच बुद्धाचं तेजोवलय आहे. या तेजोवलयावर दोन्ही बाजूस, बुद्धावर पुष्पवृष्टी करणाऱ्या अप्सरा कोरल्या आहेत. शिल्पात सर्वात खालच्या बाजुस एका चौकोनात मधोमध बुद्धाचं प्रतीक दाखवलं आहे. त्याच्या दोन्ही बाजूस बुद्धाचे अनुयायी गुडघे टेकून धर्मचक्र परिवर्तन करत आहेत.

मित्रांनो, आत्तापर्यंत आपण जे वर्णन केले ते शिल्पाच्या विषयाबद्दल केले. आता त्या **शिल्पाची संस्कृती** कोणती ते पाहू.

हे शिल्प भारतीय संस्कृतीचं आहे. गुप्तकाळात सारनाथ येथे ते बनवलं गेलं. हे शिल्प अलंकारिक शैलीत घडवलं आहे. भारतीय धर्मग्रंथात योगी पुरुषाची जी लक्षणं सांगितली आहेत त्याला अनुसरून बुद्धमूर्तीचं शिल्पकाम केलं आहे. उदा. धनुष्याकृती भुवया, कमलनेत्र, अंडाकृती चेहरा इ.

भारतीय कला प्रतीकात्मक असते. ती प्रतीकात्मकता याही शिल्पात दिसते आहे. भगवान बुद्धाचं श्रेष्ठत्व दाखवण्यासाठी त्याची आकृती खालील चौकटीतील अनुयायी व तेजोवलयावरील अप्सरांच्या तुलनेत प्रचंड दाखवली आहे. बुद्ध हा योगीपुरुष असला, तरी त्याचं जनमानसावर अधिराज्य आहे. म्हणून त्याच्यावर पुष्पवृष्टी होताना दाखवले आहे.

आता या शिल्पातील मूळ घटक पाहू या. या शिल्पातील महत्त्वाचे घटक म्हणजे आकार आणि पोत हे आहेत. त्रिकोण, चौकोन आणि वर्तुळ असे प्राथमिक आकार या शिल्पात स्पष्टपणे दिसत आहेत. बुद्धाची मूर्ती त्रिकोणात बसवली आहे. बुद्धाचं डोकं हा त्रिकोणाचा शिरोबिंदू आणि मांडी हा पाया आहे. तेजोवलय वर्तुळात, तर खालील अनुयायी चौकोनात बसवले आहेत. तेजोवलयाच्या वर्तुळामुळे एकूण शिल्पात आकारांचा तोल साधला गेला आहे.

बुद्धाची मूर्ती आणि तिच्या डो यामागच्या तेजोवलयाचं छोटं वर्तुळ सपाट, गुळगुळीत दिसत आहे. बाकी सर्व भागात शिल्पांकन केल्यानं 'पोत' या मूळघटकाचाही तोल साधला गेला आहे. गुळगुळीत पोत व खडबडीत पोत स्पष्टपणे शिल्पात दिसत आहेत.

थोड यात म्हणजे काळाला आणि संस्कृतीला अनुरूप रेषा, आकार आणि पोत या मूळघटकांचे योग्य पद्धतीनं केलेलं संयोजन आणि विषयानुरूप शिल्पशैली या सर्व गोष्टींमुळे हे शिल्प भारतीय शिल्पकलेतील उत्कृष्ट नमुन्यांपैकी एक ठरलं आहे. अशा पद्धतीनंच एखाद्या इजिप्शियन शिल्पाचं रसग्रहण करताना त्याचा ताठरपणा गृहित धरून त्याचं रसग्रहण करावं लागेल.

रसग्रहण करताना लक्षात घेण्याचा तिसरा मुद्दा म्हणजे 'कलाकृतीचं' स्वत:चं खास वैशिष्ट्य ! मूळ घटकांची सुयोग्य रचना असल्यानं आकर्षक ठरलेली अनेक शिल्पं आपण पाहतो. ती आपल्याला आवडतातही; परंतु मोजकी शिल्पेच आपल्या मनात घर करून बसतात. उदा. वेरुळ येथील कैलास लेणे ! भला मोठा प्रस्तर कळसापासून पायापर्यंत खोदत नेला आहे (आधी कळस मग पाया). गर्भगृह, सभामंडप, स्तंभ, नंदीमंडप, द्वारमंडप, अंगण, अंगणातील स्वतंत्र स्तंभ, हत्तींची स्वतंत्र शिल्पे हे सारं आवश्यक भाग ठेवून दगडाचा बाकीचा भाग काढून टाकणं, या गोष्टीचं नियोजन कसं केलं असेल, या विचारानं आपण थ क होतो. तेच त्या वास्तुशिल्पाचं खास वैशिष्ट्य आहे.

इजिप्शियन शिल्पकलेतील 'स्पिं स' नावाचं शिल्पही एकसंध खडकातून खोदून व कोरून तयार केलं आहे. हे शिल्प म्हणजे मानवी मस्तक व सिंहाचे शरीर असलेला प्राणी आहे. प्रचंड मोठ्या आकाराचं असल्यानं 'भव्यता' हीच त्या शिल्पाची खासीयत आणि सौंदर्य आहे.

थोड यात एखादे शिल्प तुम्हाला का आवडलं, भावलं याचा विचार वर सांगितलेल्या तीन प्रश्नांच्या संदर्भात करणं; म्हणजेच त्या 'शिल्पां'चा रसास्वाद घेणं होय.

❦❦

– वाच. मालती आगटे
६८, शैलेश सोसायटी,
कर्वेनगर, पुणे – ५२

(अधिक शिल्पाकृती मलपृष्ठाच्या आतील पानावर पाहा.)

लिहायचे आहे आम्हा, सारे वाचायचे आहे। शाळेमध्ये जावूनिया, खूप शिकायचे आहे ।।

। किल्ले पाहा... सिद्धगड - जि. ठाणे, ३,२२३ फूट उंच, वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक स्थान।

प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.

बंदिशाळा, कारागृह हे शब्द ऐकल्यावर आपोआपच मन आपल्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यापर्यंत जाऊन पोहोचतं. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व पणाला लावलेले ते शेकडो देशभ त, पारतंत्र्याच्या काळात अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगत होते. त्याचबरोबर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या तेथील वास्तव्याने, या स्थळाला जणू तीर्थक्षेत्राचे माहात्म्य प्राप्त झाले! त्यामुळेच 'अंदमान' हे संवेदनशील व्य तींसाठी केवळ सहलीचे ठिकाण राहात नाही, तर आपल्या तेजस्वी इतिहासाचे स्मरण ठरते. हा अनुभव सोबतचा लेख वाचताना न कीच येईल !



अंदमानचा सेल्युलर जेल - क्रांतिकारकांचे तीर्थक्षेत्र !!

- वाच. नलिनी गुजराथी

Tag No. CP130825 ActiveLink	व्हिडिओ पाहा

स्वातंत्र्यवीर सावरकरांना ब्रिटिश राजवटीविरुद्ध सशस्त्र क्रांतीचे युद्ध पुकारल्याबद्दल ब्रिटीश सरकारने दोन जन्मठेपींची उर्फ 'काळ्या पाण्याची' शिक्षा फर्मावली होती. अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये स्वातंत्र्यवीरांना सन १९१० ते सन १९२१ असे सुमारे ११ वर्षे ठेवण्यात आले होते. अंदमानचे ते कारागृह आता क्रांतिकारकांचे स्मारक बनले आहे. स्वातंत्र्यवीरांनी लिहिलेले 'माझी जन्मठेप' हे पुस्तक लहानपणीच वाचले होते. तेव्हापासूनच या ठिकाणचे दर्शन घेण्यासाठी मन ओढ घेत होते. आणि तो योग यावर्षी जुळून आला. ज्ञान प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी व कार्यकर्ते यांनी स्थापन केलेल्या प्रबोध उद्योग समूहाच्या रौप्य महोत्सवी वर्षात अंदमानच्या त्या तीर्थक्षेत्राचे दर्शन घेण्यासाठी सहल योजली होती. पुणे ते चेन्नई आणि चेन्नई ते पोर्ट-ब्लेअर असा प्रत्येकी १ ।।-२ तासांचा विमानप्रवास करून आम्ही अंदमान बेटांची राजधानी पोर्ट-ब्लेअर येथे पोहोचलो. त्या दिवशी संध्याकाळी ६ ते ७ या वेळात, प्रकाश ध्वनियोजनेचा वापर करून सादर होणारा कार्यक्रम पाहण्यासाठी गेलो.

सेल्युलर जेलच्या दारातून आत जातानाच अंग शहारले होते. कार्यक्रम पाहण्यासाठी आतील पटांगणातील खुर्च्यांवर जाऊन बसलो. हिंदीमध्ये निवेदन आणि देशभ तीपर गीते प्रसारित होत होती. *'सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है...'* हे गाणे ऐकत असताना क्रांतिकारकांच्या लढायांचा इतिहास डोळ्यांपुढे तरळू लागला होता. पटांगणात दीडशे वर्षांपूर्वीचा प्राचीन पिंपळाचा एक वृक्ष होता. कैद्यांवर होणाऱ्या अनन्वित छळाचा तो एकमेव साक्षीदार होता. हा पिंपळच जेलची कहाणी सांगतोय अशात-हेने निवेदन केले जात होते.

ब्रिटिशांची सत्ता भारतात प्रस्थापित झाली त्या सुरुवातीच्या काळात, जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कैद्यांना कोठे ठेवावे, असा विचार सुरू असताना दक्षिणपूर्वेस असलेली अंदमान बेटे ब्रिटिशांनी हेरली. बेटाच्या चहुबाजूंनी निदान हजार किलोमीटरपर्यंत समुद्राचेच पाणी. जमिनीचं दर्शनही होणार नव्हते. या ठिकाणी एकदा कैद्याला तुरुंगात ठेवले, तर तो पळून जाणे केवळ अश यप्राय होते. ब्रिटिशांनी अंदमानातील पोर्ट-ब्लेअर या त्या काळी अक्षरश: जंगल असलेल्या आणि आदिवासी राहात असलेल्या ठिकाणी सेल्युलर जेल बांधला. केंद्रभागी टेहळणीचा मनोरा होता. सुरुवातीस जेलच्या सात दुमजली इमारती, केंद्रापासून निघणाऱ्या किरणांच्या रचनेत बांधल्या होत्या. आता सातपैकी तीनच इमारती तिथे शिल्लक आहेत. तुरुंगातील ज्या ज्या ठिकाणाचे वर्णन पिंपळवृक्ष करीत होता त्या-त्या ठिकाणी प्रखर प्रकाशझोत टाकून ते ठिकाण दाखविले जात होते. दुसऱ्या दिवशी सकाळी २ तास फिरून या सर्व ठिकाणांचे प्रत्यक्ष दर्शन आम्ही घेतले. पिंपळवृक्षाने अनेक गोष्टी

किती ठेवलेले तुम्ही, दूर अक्षरांचे झुले । आता तरी द्यावी आम्हा, शिक्षणाची शब्दफुले ।।

। किल्ले पाहा... अर्नाळा - जि. ठाणे, बेटावरील बलाढ्य किल्ला ।

प्रायोजक - सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे.

आम्हाला उलगडून सांगितल्या. सुरुवातीस जन्मठेपेची शिक्षा झालेले खुनी कैदी इथे ठेवले जात. त्यांनाच मग वेगवेगळ्या कामाबरोबरच इतर कैद्यांवर देखरेखीची कामे दिली जात. नंतर नंतर सशस्त्र क्रांतिकारकांना, राजबंद्यांना इथे ठेवले जाऊ लागले. कैद्यांना हाफ पँट-शर्ट असा जाड्याभरड्या कापडाचा पोशाख दिला जाई. गळ्यात नंबरचा बिल्ला. खाण्यासाठी लोखंडी वाडगे व ताटली. जेवायला निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाई. दररोज ८ तास किंवा अधिक काळ कोलू फिरवून तेल काढणे, नारळाच्या करवंट्या फोडणे यांसारखी कष्टप्रद कामे दिली जात. जी पूर्ण करणे कैद्यांना अश य होई. मग कैद्यांना शिक्षा ठोठावली जाई. आठवडेच्या आठवडे हातापायाला बेड्यांनी जखडून ठेवले जाई. तक्रार करणाऱ्या कैद्याला जरब बसावी म्हणून फट यांची शिक्षा देत. फटके देण्याचा स्टँड तुरुंगाच्या मध्यभागी ठेवला होता; जेणेकरून फटके खाणाऱ्या कैद्याचं विव्हळणे सर्व कैद्यांना ऐकू जावे व सर्वांवर जरब बसावी !

हे निवेदन ऐकत असताना यशवंत कवींच्या कवितेतील क्रांतिकारकाच्या तोंडी घातलेल्या ओळी आठवल्या.

वाढु दे कारागृहाच्या भिंतीची उंची किती ।
मन्मना नाही क्षिती ।
भिंतीच्या उंचीत आत्मा, राहतो का कोंडुनी ।
मुक्त तो रात्रंदिनी ।

पिंपळाने शेर अली नावाच्या कैद्याची कहाणी सांगितली. त्याने तुरुंगात भेट द्यायला आलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्याचा आवारातच खून केला. या शेर अलीला लगेचच दुसऱ्या जवळच्या बेटावर फाशी दिले गेले. कालांतराने त्या ठिकाणी त्याचे स्मारक बांधण्यात आले आहे. तुरुंगातील छळाबद्दल, निकृष्ट खाण्याबद्दल, सोयीसुविधांच्या अभावाबाबत कैद्यांनी अनेकवार उपोषणे केली, आंदोलने केली होती. त्याचे पडसाद भारतात नव्हे तर जगभरात पोहोचले. त्यामुळे ब्रिटिशांना तुरुंगात सुधारणा करणे भाग पडले.

पिंपळाचे निवेदन ऐकत असतानाच अचानक
जयोऽस्तुते जयोऽस्तुते श्री महन्मंगले शिवास्पदे शुभदे ।
स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वन्दे ।।

हे स्वर उमटले आणि पाठोपाठ स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या तुरुंगातील आठवणी पिंपळाने सांगितल्या. सर्व महाराष्ट्रीयांनाच नव्हे तर सर्व भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून यावा अशीच ती स्फूर्तिदायक कहाणी होती.

पिंपळाने उल्हासकर दत्त यांनी तुरुंगात उपोषणाने हाल होऊन कसे आत्मार्पण केले; याचीही कहाणी सांगितली. अशा अनेक कहाण्या ऐकून जाणवले, की देशभरातील - विशेषत: पंजाब, बंगाल, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र या ठिकाणच्या क्रांतिकारकांनी ब्रिटिशांविरुद्ध केवढा प्रखर लढा दिला आहे. ज्यामुळे आपल्याला स्वातंत्र्य देणे ब्रिटिशांना भाग पडले.

कार्यक्रम पाहून झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तपशीलात तुरुंगाची पाहणी करण्यासाठी आम्ही गेलो. दरवाजातून आत गेल्यावर व्हरांड्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सुवचन कोरून लावले आहे. बहादुरशहा जफर यांचेही वचन वाचायला मिळाले. क्रांतिकारकांचे फोटो, त्यांच्या संबंधातील वर्तमानपत्रातील कात्रणे लावली आहेत. तुरुंगातील पोशाख, साहित्य इ. कपाटात ठेवले आहे. मूळ तुरुंगाची प्रतिकृती ठेवली आहे. आत गेल्यावर डावीकडे २४ तास प्रज्वलित केलेली क्रांतिज्योत पाहावयास मिळते. मध्यभागी वर्कशॉपमध्ये पुतळ्यांच्या साहाय्यानं कोलू फिरवणारे कैदी, नारळ फोडणारे कैदी, विविध प्रकारे बेड्या घातलेले कैदी यांचे प्रदर्शन पाहावयास मिळते. तसेच उजव्या बाजूस फाशीघर पाहावयास मिळते.

उजव्या बाजूच्या इमारतीत दुसऱ्या मजल्यावरील शेवटची कोठडी, जिथे स्वातंत्र्यवीर सावरकरांना ठेवले होते ती पाहावयास गेलो. पांढरा रंग दिलेली कोठडी, तिला मागील भिंतीस हवा येण्यासाठी उंचावर बसवलेली जाळी, कैद्याला दार उघडून पळून जाता येऊ नये म्हणून बाहेरून दाराला बसविलेली लांबलचक कडी, असे कोठडीचे दर्शन घेतले. आतल्या भिंतीवर सावरकरांचे हातापायात बेड्या अडकविलेले कैद्याच्या पोशाखातील चित्र लावले आहे. चित्राशेजारी 'कमला' काव्यातील ओळी लिहिल्या आहेत. याच कोठडीत घायपाताच्या काट्यांची लेखणी करून भिंतीवर सावरकरांनी 'कमला' हे महाकाव्य लिहिले होते. एका बाजूस स्वातंत्र्यवीरांचे

ज्ञानपालखी उचला, चला निघायचे आहे। शाळेमध्ये जाऊनिया, खूप शिकायचे आहे।।
। किल्ले पाहा... गोरखगड - उंची २१३७ फूट, जि. ठाणे, खडी, बिकट चढाई, कातळ कडे, कातळ गुहा।
प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, बंगळुरू.

सशस्त्र क्रांती विषयीच्या विचारांचा फलक लावला होता. आम्ही सर्वांनी स्वातंत्र्यवीरांच्या छायाचित्रास वंदन केले आणि प्रबोधिनीची प्रार्थना म्हटली.

‘की घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने
लब्धप्रकाश इतिहास निसर्गमाने।
जे दिव्य दाहक म्हणोनी असावयाचे
बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे।’

स्वातंत्र्यवीरांची ‘जयोऽस्तुते’ आणि ‘सागरा प्राण तळमळला’ ही गीते सर्वांनी जोषात गायली. आलेले पर्यटकही त्यात सामील झाले. भारावलेल्या अंत:करणानेच आम्ही या तीर्थक्षेत्राचा निरोप घेतला.

वाच. नलिनी गुजराथी
१२७७, शुक्रवार पेठ, सुभाषनगर,
गल्ली क्र. ५, पुणे २

अनुभवसंपन्न आणि आनंददायी सुट्टीसाठी... व्यतिकार्ये
(५ वी ते ८ वीच्या मुला-मुलींसाठी)

मित्रांनो, छात्र प्रबोधनच्या मागील महिन्याच्या (सौर चैत्र, शके १९३५) च्या अंकात केलेल्या ‘व्यतिकार्या’च्या आवाहनावरून आत्तापर्यंत तुम्ही कामाला लागलाही असाल! तुम्हाला वेगवेगळ्या कामांचा अनुभव मिळण्यासाठी खाली अजून काही कामे दिली आहेत. दोन्ही अंकात मिळून दिलेल्या ३२ कामांपैकी कोणतीही २० कामे तुम्ही पूर्ण केलीत तर... **विशेष बक्षीस!**

‘छात्र प्रबोधन’च्या वार्षिक वर्गणीत तीन महिने वाढवून मिळणार! म्हणजेच एका वर्षाच्या वर्गणीत १२ ऐवजी १५ महिने अंक मिळणार! त्यासाठी काम पूर्ण झाले, की वहीत दिनांक घालून नोंदवून ठेवा. त्यापुढे आई/बाबांची स्वाक्षरी घ्या. हा वहीचा कागद पोस्टाने आमच्या पत्त्यावर पाठवा त्यावर तुमचे नाव, गाव, पत्ता, इयत्ता अन् पानभर तुमचा व्यतिकार्य करतानाचा अनुभव लिहायला विसरू नका! आणि ‘छात्र प्रबोधन’चे तीन महिन्याचे अंक बक्षीस मिळवा.

व्यतिकार्ये – एकट्याने करण्याची कामे – १. नारळ स्वत: शेंड्या काढून फोडणे. **२.** स्वत:चा एक ड्रेस धुवून इस्त्री करावयास शिकणे. **३.** घरी आलेले वीज बिल दरपत्रकाप्रमाणे तपासून, ते भरून या. तसेच घरातील विजेवर चालणाऱ्या यंत्रांची एक यादी करा. **४.** घरात असलेल्या पुस्तकांची (पाठ्यपुस्तके/अभ्यासाव्यतिरिक्त) यादी तयार करा व त्यातल्या एखाद्यातरी जुन्या पुस्तकाची बांधणी करा. **५.** छात्र प्रबोधनच्या कोणत्याही एका अंकातील कवितेला चाल लावून ती कविता पाठ करा व घरातल्यांसमोर सादर करा. **६.** घरातील मोठ्या चादरी, पडदे धुवा आणि वाळत टाका. **७.** घरातील आजी/आजोबा किंवा वृद्ध व्यक्तीचे चरित्र लिहा. (वहीची ८-१० पाने) **८.** घरच्यांसाठी ओली भेळ तयार करा. (ओली भेळ तयार करण्यासाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंच्या खरेदीपासून बनवण्यापर्यंत, सर्व काही तुम्ही करायचे आहे.) **९.** नेहमी लागणाऱ्या दूरध्वनी क्रमांकाची एक नोंदवही तयार करा. (किमान १०० दूरध्वनी क्रमांक) **१०.** घरातील प्रथमोपचाराची पेटी तयार करा. घरात असणाऱ्या ५ औषधांची यादी करा. **११.** संगणक, मोबाईल, इंटरनेट सोडून कोणताही एक बैठा खेळ शिकून घ्या व तो इतर दोघांना शिकवा. **१२.** घर सजावटीसाठी एक कलाकृती स्वत: तयार करा. उदा. तोरण, सिरॅमिक पॉट, वॉल हँगिंग वगैरे. **१३.** सोसायटी/वाडा/आसपासच्या १५ ज्येष्ठ व्यक्तींकडून संदेश व स्वाक्षऱ्या गोळा करा. **१४.** वाड्यातील/परिसरातील कुंड्यांमध्ये वाढणाऱ्या २० प्रकारच्या वनस्पतींची माहिती गोळा करून लिहा. **१५.** घरगुती कार्यक्रमाच्या फोटोंच्या साहाय्याने जून ते डिसेंबर असे ७ महिन्यांचे टेबल कॅलेंडर तयार करा. **१६.** एखादी चांगली कादंबरी/पुस्तक (१५० ते २०० पाने) वाचून त्यावर ३-४ पानांचा पुस्तक परिचय लिहून काढा.

आज पडे हे पाऊल पहिले, यशोपथाच्या वरती । वाट चालणे जलद गतीने, सातत्याने पुढती ।।

। लेणी पाहा... कान्हेरी - बोरीवली, मुंबई, इ. स. पू. तिसरे ते नववे शतक. एकाच गोलाकार टेकडीत खोदलेल्या गुंफा ।

प्रायोजक – श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे

Tag No. CP130835 ActiveLink | व्हिडिओ पाहा

गेमिंगच्या जगतात...

काय मित्रांनो, सुट्टीची धम्माल सुरू आहे नं.. छंदवर्ग, शिबिरं, सहली, सिनेमा, मैदानी खेळ, व्हिडिओ गेम्स दिवसाचे चोवीस तास अपूरे पडतायंत नं? कुठला विचार करायचीदेखील फुरसत नाही. हो नं ? असं जरी असलं तरी मित्रांनो, तुम्ही जे व्हिडिओ गेम्स खेळता, ते तुमच्यासाठी कोण तयार करतं? त्यामध्ये कोणत्या व्य तींचा, तंत्रज्ञानाचा समावेश असतो? ते तुमच्यापर्यंत कसे पोहोचतात? हे जाणून घ्यायला तुम्ही न कीच उत्सुक असाल...

गेम बनवण्यामध्ये खालील दोन मुख्य कंपन्यांचा समावेश असतो. १) डेव्हलपर्स २) पब्लिशर्स

डेव्हलपर्स (Developers**) :** गेम बनवण्याचं काम डेव्हलपर्स करतात. डेव्हलपर्स ही स्वतंत्र कंपनी असू शकते अथवा ते पब्लिशर कंपनीमध्येही काम करतात.

पब्लिशर्स (Publishers**) :** पब्लिशर्स गेमच्या सीडीज्, गेमचे डबे इत्यादी बनवतात. तयार गेमचं वितरण, विपणन आणि जाहिरात हे सुद्धा पब्लिशर्सच करतात. काही पब्लिशर्सकडे स्वत:चे डेव्हलपर्स असतात, जे फ त त्या पब्लिशरसाठीच गेम बनवतात. तर काही पब्लिशर्स दुसऱ्या डेव्हलपर कंपन्यांशी गेम बनण्याबाबतचा करार करतात.

गेम बनवण्यात सहभागी असणाऱ्यांच्या भूमिका :

गेम निर्माते (Producers**) :** गेम यशस्वीपणे पूर्णत्वास नेणे ही निर्मात्याची जबाबदारी असते. निर्माते गेमच्या डिझायनर्स, प्रोगामर्स, आर्टिस्ट, मार्केटिंग आणि टेस्टिंग या सर्व विभागांमध्ये समन्वय ठेवतात. यांशिवाय, निर्मात्याला त्या प्रोजे टला लागणाऱ्या वेळेवर आणि खर्चावरही नियंत्रण ठेवावं लागतं.

डेव्हलपर्स (Developers**) :** डेव्हलपर्स हे गेमचे प्रोग्रामिंग करतात. गेमच्या प्रोग्रामिंगकरता बऱ्याच गोष्टींची तयारी लागते. त्यामुळे विविध प्रकारचे डेव्हलपर्स गेम बनवताना जरुरी असतात. हे विविध प्रकार पुढीलप्रमाणे असतात; लीड डेव्हलपर (मुख्य डेव्हलपर), ज्युनियर डेव्हलपर, आर्टिफिशियल इंटेलिजन्स डेव्हलपर (AI), इंटरफेस डेव्हलपर, नेटवर्किंग डेव्हलपर, इंजिन व टूल्स डेव्हलपर, ऑडीओ डेव्हलपर, ग्राफि स डेव्हलपर इत्यादी.

ग्राफिक आर्टिस्ट (Graphic Artists**) :** गेममधली पात्रे, पात्रांच्या हालचाली, इमारती, वाहने इत्यादी गोष्टी ग्राफिक आर्टिस्ट बनवतात. एकंदरीत आपण जे काही गेम मध्ये बघतो; ते ग्राफिक आर्टिस्ट बनवतात. ग्राफिक आर्टिस्टमध्ये साध्या कागदावर चित्रे काढणारे कलावंत (कन्सेप्ट आर्टिस्ट), द्विमितीय (२D) व त्रिमितीय (३D) आर्टिस्ट, ॲनिमेटर्स इत्यादींचा समावेश असतो. डिझाईन व मार्केटिंग ग्राफिक आर्टिस्ट गेमच्या सीडीच्या डब्यांवरील डिझाईन, गेमची वेबसाईट आणि गेमच्या जाहिराती तयार करतात.

गेम बनवण्याच्या प्रक्रियेतले टप्पे :

'अल्फा फेज' (Alpha Phase**) –** डेव्हलपर्स आणि ग्राफिक आर्टिस्ट एकत्र काम करून गेमची पहिली आवृत्ती तयार करतात. गेम बनवण्याच्या दोन टप्प्यांपैकी हा पहिला टप्पा. याला 'अल्फा फेज' म्हणतात. या टप्प्यात

ज्ञान विज्ञान चक्षूंनी, ओळखावे विश्वरूप। कार्यमग्न साधकांनी, द्यावे जगा नवे रूप ।।

। मंडपेश्वर - बोरीवली, मुंबई, इ. स. सहावे शतक, हिंदू देवतांच्या प्रतिमा तसेच गुंफेतील चर्चचे एकमेव उदाहरण ।

प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे.

बनवलेल्या गेमच्या आवृत्तीला 'अल्फा व्हर्जन' म्हणतात. या टप्प्यामध्ये गेम अगदी अस्थिर स्थितीमध्ये असतो. या टप्प्यावर गेम नीट खेळता येत नाही; कारण त्याच्या प्रोगॅमिंगमध्ये बरेच दोष असतात. त्यांना 'बग' म्हणतात. गेम बनवण्याच्या प्रक्रियेतील डेव्हलपमेंटएवढंच महत्त्वाचं काम म्हणजे, हे 'बग' काढून टाकणं होय. या बग काढण्याच्या प्रक्रियेला परीक्षण अथवा 'टेस्टिंग' करणं म्हणतात.

गेमच्या परीक्षणाचं वा टेस्टिंगचं काम जे करतात त्यांना 'गेम टेस्टर' म्हणतात. हे टेस्टर्स गेम सतत खेळून त्यामधले दोष शोधून काढतात आणि या दोषांची यादी डेव्हलपर्सकडे देतात. डेव्हलपर्स गेमच्या प्रोग्रॅमिंगमध्ये गरजेनुसार बदल करून गेमची नवीन आवृत्ती तयार करतात आणि परत टेस्टर्सकडे देतात. टेस्टर्स परत नवीन दोष शोधून डेव्हलपर्सना देतात. गेममधील जवळपास सर्व दोष जात नाहीत, तोपर्यंत हे चक्र चालू राहते.

'बिटा फेज' (Beta Phase**) –** जसे गेममधले दोष (बग) कमी होतात, तसे गेम बनवण्याची प्रक्रिया पुढच्या टप्प्यात जाते. या दुसऱ्या टप्प्याला 'बिटा फेज' म्हणतात. या फेजमध्ये गेमची सुधारित आवृत्ती निघते, ज्याला बिटा व्हर्जन म्हणतात. गेमच्या एखाद्या आवृत्तीला 'बिटा व्हर्जन' म्हणून पास करण्यासाठी गेम पूर्णपणे खेळण्यायोग्य असावा लागतो. गेममधले आवाज, ग्राफि स, पात्रांचे ॲनिमेशन वगैरे नीट असावे लागते. बिटा फेजमध्ये गेम जरी जवळपास पूर्ण तयार झालेला असला, तरी काही छोटे दोष त्यात राहतातच. काहीवेळा गेमचे निर्माते या बिटा व्हर्जनमधला गेम काही निवडक ग्राहकांना थोड्या काळासाठी खेळायलासुद्धा देतात, जेणेकरून निर्मात्यांनाही ग्राहकांची गेमबद्दलची प्रतिक्रिया कळते. ग्राहकांच्या प्रतिक्रियेनुसार निर्माते गेममध्ये बदल करू शकतात.

'सबमिशन प्रोसेस' (Submission Process**) –**

जेव्हा गेम ए सबॉ स (Xbox) 360 किंवा Playstation 3 किंवा या प्रकारच्या गेमिंग कन्सोल्ससाठी बनवतात, तेव्हा गेमची जवळपास पूर्ण झालेली आवृत्ती ही कन्सोलच्या निर्मात्यांना (उदा. Microsoft, Sony, Nintendo) देतात. निर्मात्यांकडचे लोक तो गेम खेळून बघतात. आणि आपल्या कन्सोलवरून हा गेम प्रकाशित होऊ द्यायचा का नाही, हे ठरवतात. निर्मात्यांनी स्वत:चा दर्जा राखण्यासाठी काही अटी घातलेल्या असतात. या प्रक्रियेला 'सबमिशन प्रोसेस' म्हणतात. जर गेम निर्मात्यांच्या सर्व अटी आणि गरजा पूर्ण करत असेल, तरच त्या गेमनी ही सबमिशन प्रोसेस पास केली, असं म्हटलं जातं. नाहीतर त्या गेमला पुन्हा पूर्ण सबमिशन प्रोसेसमधून जावं लागतं. पास झालेला गेम पुढे २ ते ३ महिन्यांमध्ये प्रकाशित होऊन दुकानांमध्ये विकायला येतो.



गेमिंगमधील बदलते ट्रेंडस : स्मार्टफोन्स आणि टॅब्लेटस् ही गेल्या दोन वर्षांतली लोकप्रिय होऊ लागलेली मनोरंजनाची साधने आहेत. स्मार्टफोन आणि टॅब्लेटस् हे डेस्कटॉप / लॅपटॉप किंवा गेम कन्सोल्सपेक्षा हातात घेऊन जायला सोपे असल्यामुळे; लोक संगणक अथवा गेम कन्सोल्स वर बसून खेळण्यापेक्षा स्मार्टफोन्स अथवा टॅब्लेटस्‌वर खेळणं अधिक पसंत करतात. यामुळे, स्मार्टफोन्स आणि टॅब्लेटस्‌वरच्या गेम्सची संख्या गेल्या दोन वर्षात अतिशय वाढली आहे. बहुतांश मोबाईल गेम्स हे खेळण्यास फुकट अथवा बरेच स्वस्त असतात, त्यामुळे लोक त्यावर खेळण्यासाठी आकर्षित होतात. मोबाईल गेम्सचा उद्योग हा यावर्षी १.२ अब्ज डॉलरपर्यंत वाढेल असा अंदाज आहे.

खेळण्याचे विविध नवीन मार्ग –

आजकाल गेम्स खेळणे हे कीबोर्ड / माऊस किंवा कन्सोलच्या कंट्रोलवरच अवलंबून राहिलेलं नाही. मागील काही वर्षात Xbox 360, Move (Playstation) आणि Wii (Nitendo Wii) असे नवीन प्रकार आलेले आहेत. या नवीन प्रकारांमुळे गेम खेळणं अधिक मजेदार आणि

अशी असावी ज्ञानमंदिरे, गुणी असावी मुले। भारतभूच्या सेवेची, दीक्षा त्यांना मिळे।।

। लेणी पाहा... मगाठणे - आकुर्ली, मुंबई. इ. स. दुसरे ते नववे शतक. ध्यान मुद्रेतील आसनस्थ बुद्धमूर्ती प्रेक्षणीय।

प्रायोजक – सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.

काही मजेदार गेम्स

Need For Speed, Dragon Age, Elder Scrolls : Skyrim, The Sims, Fifa 2013, Counter Strike, Age of Empires, Company of Heroes, Starcraft, Warcraft 3, World of Warcraft, Guild Wars, World in Conflict, Driver : San Francisco, Battlefield 3, Diablo 3, Heroes of Might and Magic, Hitman : Absolution, Torchlight, Darksiders, Dungeon Siege 3, Orcs Must Die ! Magicka, Crysis, Far Cry.

सोपं झालंय, उदाहरणार्थ : Kinect वापरून गेम खेळताना, आपलं गेममधलं पात्र (Character) आपण जसं हालचाल करू तसंच हलतं. टेनिस किंवा गोल्फ खेळताना आपण हातांची जशी हालचाल करू तशीच हालचाल Playstation 3 वापरून करता येते. ज्या लोकांना गेम खेळण्याची आवड नाही, ते सुद्धा या नवीन प्रकारांमुळे गेम खेळण्याकडे आकर्षित होऊ लागले आहेत.

सोशल गेम्सची वाढती लोकप्रियता – गेल्या ३-४ वर्षांपासून **फेसबुक** आणि **गुगल+** यांसारख्या नेटवर्किंग वेबसाईटस् वर 'फार्मव्हील' सारखे गेम्स लोकप्रिय होऊ लागले आहेत. हे गेम्स खेळण्यास फुकट असतात. आपण आपला जास्त वेळ न घालवता गेम खेळण्याची मजा घेऊ शकतो. त्याचबरोबर हे गेम्स मित्रांसोबतही खेळू शकतो. गेमच्या निर्मात्यांना microtransaction पद्धतीनं या गेम्समधून उत्पन्न मिळतं. आपल्याला गेममधील काही ठरावीक गोष्टी विकत घ्यायला पैसे मोजावे लागतात. याच पद्धतीला Microtransaction पद्धत म्हणतात. निर्मात्यांचे उत्पन्न नियमित चालू राहण्यासाठी निर्माते नवीन गोष्टी गेममध्ये आणत राहतात. प्रत्येकवेळी नवनवीन गेम्स खेळण्यातला आनंद आपल्याला लुटता येतो.

– सत्यजीत बाजी, satyajeet.baji@sqs.com
– पंकज यादव, pankaj.yadav@sqs.com

आनंद !

आपुले हे घर
कुंभ अमृताचा
भरावा आकंठ
आनंदाने ! ॥१॥

घरात वाहावा
झरा आनंदाचा
झुळूकही यावी
आनंदाची ! ॥२॥

मुलांनी सतत
कार्यमग्नतेत
शोधावे नवीन
आनंदांना ! ॥३॥

असता आपुले
हातात हे हात
काय मग तूट
आनंदाची ! ॥४॥

न मिळे कधीही
शोधता बाहेर
आपुला आनंदु
आपल्यात ! ॥५॥

सुख घरी येता
यश प्राप्त होता
आनंदी आनंद
चोहीकडे ! ॥६॥

परंतु दुःखात,
अपयशासही,
झेलाया आनंदे
शिकावे गा ! ॥७॥

अतृप्त मनाच्या
तळीही राहीना,
समाधानी मनी
आनंदौघ ! ॥८॥

– विनीता तेलंग
द्वारा सदर्न स्टेशनरी स्टोअर्स, बालाजी चौक,
मेन रोड, सांगली 416416

चैतन्याच्या लाटेवरले पक्षी, आम्ही मुले। नव्या दिसाची पहाट अमुच्या, पंखांवरती फुले॥

। लेणी पाहा....घारापुरी - एलिफंटा लेणी, मुंबई इ. स. सहावे शतक, त्रिमुर्ती, नटराज, योगेश्वर शिल्पांसाठी प्रसिद्ध।

प्रायोजक – स्टॅटफिल्ड इ विपमेंट, पिरंगुट, पुणे.

बादल

– अनु. माधव शाळिग्राम

आजोबांनी हु का पीत त्याला अगदी नीट न्याहाळून पाहिलं आणि म्हणाले, ''बेटा, ढग काही लपून छपून तर येणार नाहीत. ढग दाटून आले तर आकाशाला आणि जमिनीला समजेलच की !'' या कथेतील मुलगा ढगांच्या शोधात रानोमाळ भटकतोय... भेटतील त्याला पाऊस पाडणारे ढग? जाणून घेऊया सोबतच्या या कथेत.

तो ढगांच्या शोधात दूरवर गेला. गल्लीबोळातून भटकत कच्च्या विहिरीपाशी पोचला. तिथून पायवाटेनं चालू लागला आणि शेताशेतातून चालत राहिला. समोरून एक गवतवाला डो यावर गवताचा भारा घेऊन येत होता. त्याला थांबवून विचारलं,

''बाबा, इकडे ढग आले होते का?''

''ढग?''

पण जेव्हा गवतवाल्याच्या आश्चर्यचकित चेहऱ्यात काहीच फरक पडला नाही, हे लक्षात आल्यावर तो निराश होऊन चालू लागला. पुढे जाऊन शेत नांगरत असलेल्या शेतकऱ्यालाही त्यानं हाच प्रश्न विचारला,

''इथे ढग आले होते का?''

शेतकऱ्यालासुद्धा हा प्रश्न समजला नाही, तो बावचळून म्हणाला, ''ढग?''

''होय, ढग.''

खरं तर तो ढगांविषयीचा प्रश्न अशातऱ्हेनं विचारत होता, की जणूकाही रस्ता चुकलेल्या मुलासारखे ते ढग हरवले आहेत. परंतु त्याला कोणीच समाधानकारक उत्तर देऊ शकलं नाही.

सर्वात प्रथम त्यानं सकाळी उठल्या उठल्या आईलाच हा प्रश्न विचारला होता, ''आई, ढग कुठे गेले?''

''कोण कुठे गेले?'' आईनं त्याला असं काही विचारलं की जणू त्यानं एखादा मूर्ख प्रश्न विचारला होता.

ढग. शब्दावर अधिक जोर देत तो म्हणाला.

गगन भरारी घेत दिशांचे, हात हाती घेऊ। उजेडवेड्या आकांक्षांचा, सूर्य आम्ही पाहू।।

। किल्ले पाहा... सुधागड - जि. रायगड - टकमक टोक व भव्य सुस्थितील वास्तू प्रेक्षणीय ।

प्रायोजक – श्री. अजित विद्याधर परांजपे, अमेरिका.

''ढग? तुझं डोकंबिकं फिरलंय का?... चल पटापटा तोंड, हातपाय धू. नाश्ता कर आणि शाळेला जा. ढग म्हणे...''

आईच्या या सुरातील बोलण्यानं त्याची खूप चिडचिड झाली. त्यानं थोडं उदास होऊनच तोंड, हातपाय धुतलं, नाश्ता केला, दप्तर गळ्यात अडकवून तो शाळेला निघाला. परंतु घरातून निघाल्यानंतर त्याच्या डो यात पुन्हा हाच प्रश्न उभा राहिला. ढग गेले कुठे? आणि त्याचबरोबर त्याला आठवलं, की त्या रात्री त्यावेळी त्यानं दाटून आलेले ढग गर्जना करताना पाहिले होते. झोपायच्या वेळेस त्याला आकाश निरभ्र व चांदण्यांनी भरलेलं दिसलं होतं. वारा अजिबात नव्हता आणि उकाड्यानं झोपही येत नव्हती. मोठ्या मुश्किलीनं त्याला झोप आली. मध्येच त्याला जाग आली, तेव्हा कोण जाणे किती वाजले होते. किती का वाजले असे ना, त्याच्या दृष्टीनं ती मध्यरात्र होती. दूर आकाशात ढग गुरगुर करत जमा होत होते. मधून मधून वीजही चमकत होती आणि विजेच्या त्या प्रकाशात ढग अधिकच काळेकुट्ट दिसत होते. त्याला वाटलं खूपच जोराचा पाऊस येणार आहे; पण त्यामुळे झोप किती मोडेल. बस्, त्याच शंकेनं त्यानं डोळे बंद केले. तो गाढ झोपून गेला. सकाळी उठला तर चकितच झाला. आकाश... आकाश तर अगदीच निरभ्र होतं आणि अंगणात पाऊस पडून गेल्याचं कोणतंच चिन्ह दिसत नव्हतं. प्रथम त्याला आश्चर्यच वाटलं आणि नंतर वाईटही वाटलं, की ढग एवढे दाटून आले होते आणि पाऊस पडला कसा नाही? मग ते ढग गेले कुठे? आणि वाईट याचंही वाटलं, की त्याला झोप लागलीच कशी? जसं काही तो जागत बसला असता तर ढग असे नाहीसे झालेच नसते. अगदी वर्षाव करूनच गेले असते.

पाऊस जर पडला असता, तर तो या मोसमातला पहिला पाऊस झाला असता. परंतु तो झोपेत असतानाच ढग जमा झाले व एकाएकी निघूनही गेले. पावसाचा एक थेंबही पडला नाही. पावसाळा कोरडाच चालला होता.

सायंकाळी प्रभुच्या पायी, वंदन करण्या विसरू नये। एक 'कर्म' जे करि घेतले, अर्ध्यावर ते सोडू नये।।

। किल्ले पाहा... कोथळीगड - उंची १५५० फूट, जि. रायगड, कातळात खोदलेला भुयारीमार्ग प्रेक्षणीय।

प्रायोजक – श्री. राजेश शंकर शेलार, पुणे.

चालता चालता त्यानं पुन्हा एकदा आकाशाकडे पाहिलं. तो शाळेचा रस्ता सोडून शेताच्या रस्त्याकडे निघाला. शेतांच्या मधे मधे असलेल्या छोट्या पाऊलवाटांवरून चालत चालत तो लांबवर गेला. ऊन अगदी रणरणत होतं. त्याचं अंग अगदी आंबून गेलं होतं, घसा कोरडा पडला होता. अनेक अशी शेते पार केल्यानंतर दाट सावली असलेलं एक झाड त्याला दिसलं. त्याच्या सावलीतच एक रहाट होता. जणू वाळवंटातून चालत असता त्याला एखादे मृगजळच दिसले. त्या झाडाच्या सावलीत जाऊन त्यानं आपलं दप्तर एका बाजूस ठेवलं. आडाच्या जवळ जाऊन रहाटानं पाणी काढून तोंड, हातपाय धुतले आणि पोटभरून पाणी प्यायलं.

तोंड, हातपाय धुतल्यावर आणि पाणी प्यायल्यावर त्याला जरा तरतरी आली. मग त्यानं आजूबाजूला पाहिलं. आडाच्या जवळच एका तुट या बुंध्यावर एक आजोबा हु का पीत बसले होते.

तो बराच वेळ त्या आजोबांकडे पाहात राहिला. त्याला काही बोलावंसं वाटलं; पण त्याला धीर होईना. शेवटी सगळे धैर्य एकवटून तो म्हणाला,

''आजोबा, इथं ढग आले होते?''

आजोबांनी हु का पीत त्याला अगदी नीट न्याहाळून पाहिलं आणि म्हणाले, ''बेटा, ढग काही लपून छपून तर येणार नाहीत. ढग दाटून आले तर आकाशाला आणि जमिनीला समजेलच की.''

''पण रात्री ढग आले होते, ते कोणालाच कसं समजलं नाही?''

''रात्री ढग आले होते?'' आजोबांनी विचार केला आणि ते मोठ्याने म्हणाले,

''अरे अल्लादीन, रात्री ढग आले होते कारे?''

बैलांना हाकता हाकता अल्लादीन थांबला आणि म्हणाला,

''मी तर रातच्याला खाटेवर पाठ टेकल्या टेकल्या झोपून गेलो जी, मला काही ठावं नाही.''

मग आजोबा म्हणाले, ''बेटा!



आनंदाने रमणे-गमणे, हा अमुचा अधिकार। सतत तोडणे आणि जोडणे, हा अमुचा अधिकार।।

। किल्ले पाहा... कांसा - (पद्मदुर्ग) जि. रायगड, वैशिष्ट्यपूर्ण दुर्ग बांधणी, जवळचे ठिकाण मुरूड ।

प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.

केवळ ढग जमल्यामुळे काही होत नाही. मी तर अशा ठिकाणी राहिलो आहे, जिथे दहा वर्षांपासून पाऊस पडला नव्हता.''

''दहा वर्षे?'' तो 'आ' वासून बघतच राहिला.

''होय, दहा वर्षांपासून; पण तेव्हाही ढग येतच होते. पण पावसाचा एक थेंबही पडला नाही.''

''विचित्रच आहे.''

''काही विचित्र नाही. पाऊस 'त्याच्या' आज्ञेनं पडतो. 'त्याची' आज्ञा नसेल तर ढग पाऊस पाडत नाहीत,'' आजोबा आकाशाकडे बोट दाखवत म्हणाले.

आजोबांचे हे बोलणे ऐकता ऐकताच त्याला रात्रीचे ढग जमलेले आठवले. ते ढग अंधाराबरोबर असे जमून आले होते, की जणू सगळीकडे पाणीच पाणी होईल. पण एक थेंबही न देता ते निघून गेले.

आजोबांनी तापणाऱ्या आकाशाकडे पाहिलं व पुटपुटले, ''मोसम निघून चालला आहे. 'त्याचा' हुकूम कधी येणार कोण जाणे?''

उत्तरादाखल तोही पुटपुटला, ''ढग येऊन कुठे गेले कोण जाणे.''

''बेटा, पाऊस पडलाच तर बातम्या नाही का येणार? आभाळ कंजूष झालंय आणि जमिनीलाही काही साठवण्याची श ती राहिली नाही. पाऊस झालाच नाहीये. समजा झालाच तर पूर येतो.''

आजोबांचं बोलणं त्याला थोडं समजलं तर काही समजलंच नाही. तो बसून ऐकत राहिला. अचानक त्याला जाणवलं, की फारच उशीर झाला आहे. त्यानं दप्तर घेतलं अन् उठून उभा राहिला. माती, धूळ, कडक ऊन यात तो चालतच राहिला. ज्या रस्त्यानं तो आला होता त्याच रस्त्यावरून तो परत चालला होता. उन्हे अजूनही तळपतच होती; पण जेव्हा तो कच्च्या विहिरीपाशी पोचला तेव्हा त्याला जाणवलं, की हवेत एक गारवासा आला आहे आणि पायाखालची मातीही काहीशी दमट दमट झाली आहे.

घराजवळच्या वस्तीत आल्यावर त्याला दिसलं, की रस्ता तिथपर्यंत ओला झालेला आहे. जाताना जी झाडं त्याला धुळीनं माखलेली दिसली होती ती आता तशी नाहीत. ती स्वच्छ आंघोळ केल्यासारखी चमकत होती. मागच्या पावसानंतर जो नाला कोरडाच होता तो आता वाहात होता. आनंदाची एक सूक्ष्म लहर त्याच्या अंगातून नाचत गेली. त्याला आता घरी लवकर पोहोचायचं होतं. त्याला त्याच्या अंगणातील जांभळाचं झाड टवटवीत झालेलं पाहायचं होतं.

घरी पोचल्यावर पावसामुळे वातावरणात झालेला बदल त्याला जाणवला. जांभळाच्या झाडाची बरीच पानं खाली गळून पडली होती. ती चिखलानं माखलेली होती. मात्र झाड आंघोळ केल्यासारखं स्वच्छ, धुतलेलं दिसत होतं. आई मोठ्या आनंदानं म्हणत होती,

''बरं बाई, चांगलाच पाऊस झाला, अल्लाचीच मेहेरबानी! या उन्हाळ्यानं माझा तर जीव अगदी गुदमरला होता.''

त्याची नजर आकाशाकडे गेली. आकाश अगदी स्वच्छ धुतल्यासारखं दिसत होतं. आता तिथं एकही ढग नव्हता. त्याच्या मनात विचार आला, 'ढगांच्या शोधात आपण धुळीत, मातीत, रणरणत्या उन्हात किती लांबवर गेलो होतो. आणि ढग त्याच्या मागून येऊन बरसून, निघूनसुद्धा गेले!' या विचारानं तो हिरमुसला. पावसात भिजलेली ही सारी सृष्टी आपल्याला जणू वाकुल्या दाखवतेय, असं क्षणभर वाटलं त्याला. 'पाऊस पडूनसुद्धा आपण 'कोरडेच' राहिलो', या विचारानं त्याक्षणी त्याला अगदी उदास वाटलं.

त्यानं जांभळाच्या झाडाकडं पाहिलं. जांभळाच्या फांद्यावरून अजूनही टप् टप् करत थेंब पडत होते. तो झाडाच्या खाली उभा राहिला व ते थेंब आपल्या डो यावर, गालांवर घेत राहिला... कितीतरी वेळ...

❦❦

– मूळ उर्दू लेखक : इंतखार हुसेन

– भावानुवाद माधव शाळिग्राम

६९/८, स्नेह सोसायटी,
रामबाग कॉलनी, पौंड रस्ता,
कोथरूड, पुणे – ३८

अभ्यासाविण यश ना मिळते, उगाच दैवा कौल कशाला। प्रयत्न करणे अपुल्या हाती, अन्य कुणाला बोल कशाला।।

। किल्ले पाहा... कुलाबा किल्ला - (अलिबाग) जि. रायगड चुनाविरहित भ कम बांधकाम ।

प्रायोजक – श्री. शंतनू पटवर्धन, इलिनॉइस, अमेरिका.

चला ! वस्तूंचे गुणधर्म बदलून बघूया !

डॉ. नलिनी गुजराथी

शीर्षक वाचून तुम्हाला प्रश्न पडला असेल, की प्रत्येक वस्तूचे, पदार्थाचे गुणधर्म तर निश्चित असतात तर मग ते बदलता कसे येतील? अहो, मीठ हे खारटच असणार ना? मग, गुणधर्म बदलणार म्हणजे काय तुम्ही मीठाची चव बदलणार? ते आंबट, तिखट करणार? मीठ हे पांढऱ्या रंगाचं, स्फटिक रूपातील किंवा पावडर स्वरूपातील घनद्रव्य आहे. मग तुम्ही काय मिठाचा रंग बदलणार का ते द्रवरूप करणार? काहीतरीच तुमचं तरी (डोकं उलटंच चालतं तुमचं).

पण मला सांगा, खरंच असं करता आलं तर? शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि उद्योजकांनी खरंच असे प्रयोग केलेत. फलस्वरूपी टाटांनी मिठाची नवीन उत्पादनं च क बाजारात विक्रीलासुद्धा आणलीत! टाटानमक - टाटा मीठ तुम्हाला माहितीच आहे. त्याच टाटांनी Flavored Salt 'Flavaritz' या नावानं बाजारात आणलेत! त्यातील एकाची गंध व चव आहे 'Lemon-Corriander' ची म्हणजेच लिंबू, कोथिंबिरीची ! दुसरी आहे 'Red Paprika' ची म्हणजे लाल मिरचीची चव ! तर तिसरी आहे आल्याची ! चिवड्यात मीठ टाकायचे असेल तर 'लिंबू कोथिंबिरी'चे मीठ टाका ! मसाला पापडावरील टोमॅटोवर लाल मिरचीवालं मीठ शिडका ! झालं की नाही काम सोपं ! मी स्वत: घरी हे फ्लेवर्ड मीठ वापरून बघितलंय. न कीच ते अधिक उपयोगी आणि लज्जत वाढवणारं आहे.

आता या उदाहरणापाठीमागे असलेलं शास्त्रीय तंत्र आपण समजावून घेऊ या ! त्या तंत्राचं नाव आहे **Attribute listing किंवा गुणधर्म सूची !** तसं पाहिलं तर हे तंत्र खूप पूर्वीच १९५४ मध्ये **रॉबर्ट क्रॉफर्ड** या नेब्रास्का विद्यापीठातील संशोधकांनी शोधलं आहे. या तंत्रातील ५ मूलभूत तत्त्वं त्यांनी अशी मांडलीत.

१. निर्मिती ही केवळ उत्स्फूर्तपणे घडणारी प्रक्रिया नाही. उलट ती अनुकरण आणि प्रयोगशीलता यावर आधारित आहे.

आपण नेहमीच म्हणतो, की 'काहीच' जणांना भन्नाट कल्पना सुचतात ! आम्ही त्यातले नव्हेत ! तर अगदी सर्वसामान्य विद्यार्थ्यांना, शिकणाऱ्यांना - न शिकणाऱ्यांना सर्वांना दिलासा देणारा हा विचार आहे, की 'आपल्यालाही कल्पना सुचू शकतील ! त्यासाठी इतरांना काय कल्पना सुचताहेत ते पाहा - त्याचे अनुकरण करा (म्हणजे फ त कॉपी नव्हे!) स्वत: प्रयोग करून काही खटपट करून पाहा ! जसं एडिसननं लहानपणी भींतीवर फिरणारी झुरळं मारणारं एक इले ट्रिक मशीन तयार केलं होतं म्हणे! मागच्या वर्षी एका ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यानं दिवाळीतल्या टिकल्या फोडणारं गलोलीसारखं यंत्र तयार केलं होतं. असे खटपटे व्हा.

२. निर्मिती म्हणजे फ त यांत्रिकपणे वेगवेगळ्या कल्पना किंवा गुणधर्म एकत्र करणे नव्हे ! तर निर्मिती म्हणजे गुणधर्मांमध्ये उपयु त असे बदल करणे होय !

अगदी सुरुवातीला मिठातील गुणधर्म बदलून नवीन प्रकारचं उपयु त फ्लेवर्ड मीठ तयार करण्याचं उदाहरण याच सूत्राचं स्पष्टीकरण करतं.

३. वस्तूच्या गुणधर्मांमध्ये बदल करीत असतानाच निश्चित, नेमके, ठोस पर्याय शोधावेत ! गुणधर्मांमध्ये मोघम बदल सूचविल्यानं हाती काही लागत नाही. उदा. रेल्वेगाडीतील सीटचे गुणधर्म बदलायचे झाले तर कडक लागणारी सीटस् मऊ असावीत असं मोघम सुचवू नये. त्याऐवजी ती उशीसारखी किंवा फोमसारखी मऊ असावीत असे नेमके पर्याय सुचवावेत. (हे उदाहरण रॉबर्ट क्रॉफर्डच सुचवितात.)

४. वस्तूच्या गुणधर्मात बदल सुचवीत असताना सुरुवातीला त्या वस्तूच्या जवळचे, परिचयातील पर्याय आठवून बघावेत. नंतर अधिकाधिक अपरिचित, अवघड पर्यायांचा विचार करावा.

उदा. खोडरबरात बदल करून नवीन प्रकारचं खोडरबर तयार करायचं झाल्यास; खोडरबर चौकोनी असतं हा गुणधर्म लगेचच ध्यानात येतो. मग चौकोनी आकाराऐवजी गोल, षट्कोनी, कार्टुनच्या आकाराचं रबर बनविण्याचे पर्याय सहजच सुचतात. पण रंग किंवा टाइपिंगची शाई पुसणारं खोडरबर बनवावं, खोडरबराचा खोडून खोडून काळा झालेला भाग आपोआप खरवडला जावा, हे त्याप्रमाणे थोडे अवघड, अपरिचित पर्याय आहेत. अर्थात अशा पर्यायांमुळे नवनिर्मिती ही अधिकच 'Original' किंवा अभिजात बनते, हे ध्यानात घ्यायला हवं!

५. निर्मिती म्हणजे फ त कल्पनाचौर्य नव्हे! एखाद्या वस्तूत सातत्यानं छोटे छोटे बदल दीर्घकाळ करीत राहिल्यास शेवटी काळाच्या ओघात प्रचंड बदललेली एक वेगळीच, नवीन वस्तू तयार झाल्याचं लक्षात येतं.

दैनंदिन जीवनात वापरत असलेल्या काही वर्षांपूर्वीच्या कार, टी. व्ही., मोबाईल इ. अनेक वस्तूंचं पहिलं रूप आणि आत्ताचं रूप आपण बघितलं, तर त्यात किती आमूलाग्र बदल झाले आहेत हे लक्षात येतं. कुठं ती फियाट कार आणि कुठं आताची लॉरा, मर्सिडीज? कुठं तो पहिला ब्लॅक अँड व्हाईट टी. व्ही आणि आताचा थ्रीडी टीव्ही. मोबाईलच्या नवनवीन गुणधर्मांबद्दल तर बोलायलाच नको ! हे पाहून रॉबर्ट क्रॉफर्डनं सांगितलेली तत्त्वं किती मनोमन पटतात नाही का!

मग आता सज्ज व्हा नवनिर्मितीला! आपल्या विज्ञान किंवा रसायनाच्या पाठ्यपुस्तकात कोणकोणत्या वस्तूंचा तुम्ही अभ्यास करत आहात ते शोधा! किंवा अगदी दैनंदिन वापरातील वस्तू निवडलीत तरीही चालेल. तिचे कोणकोणते गुणधर्म आहेत ते नीट निरीक्षण करून नोंदवा. त्या प्रत्येक गुणधर्मात कोणकोणते बदल करता येतील याचे पर्याय काढा! एखादा वेगळा पर्याय सुचला तर 'छात्र प्रबोधन'ला कळवा. त्याला जरूर प्रसिद्धी देण्यात येईल.

कृतीपाठ – २

खालील काही उपकरणांमध्ये बदल सुचवा–

१) ब्युरेट २) पिपेट ३) गॅस बर्नर ४) शोभादर्शक
५) वजन काटा   ६) थर्मास फ्लास्क
७) मायक्रोस्कोप   ८) ट्यूबलाइट
९) थर्मामीटर   १०) चष्मा

❦❦

– वाच. नलिनी गुजराथी
१२७७, शुक्रवार पेठ, सुभाषनगर, रस्ता क्र. ५, पुणे 411002

कर्तव्याची जाण



गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांना एका ठिकाणी भाषणास जायचे होते. गडबडीत त्यांनी चपला पायात घातल्या अन् ते निघाले. एका चपलेचा खिळा निघाला होता; त्यामुळे त्यांच्या पायाला दुखापत झाली. तशाही स्थितीत ते चालत होते. सभास्थानी त्यांनी नेहमीप्रमाणे चांगले भाषण केले.

त्यानंतर काही लोकांनी त्यांच्या पायातून र त येताना पाहिलं आणि ते म्हणाले, ''गुरुदेव कमाल आहे तुमची! इतकं दुखणं सहन करूनही तुम्ही भाषणात खंड पडू दिला नाहीत– तुम्ही थांबला का नाहीत?'',

''सगळे बंधू माझ्या भाषणात गुंग झाले होते आणि माझे विचार ऐकून त्यांचे आनंदित चेहरे मला दिसत होते. अशा स्थितीत आपलं दुःख सांगणं मला शोभादायक वाटलं नाही–''

गुरुदेवांची ही कर्तव्यनिष्ठा पाहून लोक अचंबित झाले.

– केशव फडणीस

अविस्मरणीय भेट !

– चि. श्रीरंग टोके

मित्रांनो, सुट्टी म्हटलं की खेळ, मजा आणि अभ्यासापासून सुटका. पण हीच सुट्टी ज्ञान व अनुभव देणारी असू शकते; याचा प्रत्यय मला आला.

'प्रकाशवाटा' हे डॉ. प्रकाश आमटे यांचं पुस्तक वाचल्यापासून हेमलकसा येथे जावं असं मनापासून वाटत होतं. ती माझी इच्छा नुकतीच पूर्ण झाली. या प्रकल्पाबद्दल आम्ही जे प्रत्यक्षात पाहिलं, ते मी तुम्हाला सांगणार आहे. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालु यामध्ये हेमलकसा प्रकल्प आहे. तिथे १९७० साली हा प्रकल्प चालू झाला. अर्थातच तिथे घनदाट जंगल. हेमलकसा हे मॅगेसेसे पुरस्कार विजेते व ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश व सौ. मंदाताई आमटे यांचे निवासस्थान. त्यांच्या अतुलनीय कार्याबद्दल वेगळं सांगायची गरज नाही.

आम्ही पुण्याहून वर्ध्याला रेल्वेने गेलो व पुढे गाडी केली. लोकबिरादरीचा नागेपल्ली येथील प्रकल्प पाहिला. तेथील व्यवस्थापक जगनकाका व मु ता वहिनी यांच्याशी गप्पा मारल्या. जगनकाकांनी बाबा आमटेंसोबत खूप वर्षं काम केलं होतं. जगन काकांचं काम पाहून, ऐकून खूपच प्रेरणा मिळाली. काकांचे आशीर्वाद व निरोप घेतला आणि हेमलकसाला निघालो. तिथे जाताना प्रचंड उत्सुकता होती. संध्याकाळी हेमलकसाला पोहोचलो. तेव्हा फारसं काही दिसलं नाही. रात्री बरोबर सात वाजता मेसमध्ये जेवण असतं. आमटे कुटुंबीयदेखील आमच्यासोबत जेवायला होते. रात्री काही वेळ अनिकेत प्रकाश आमटे यांच्याशी बोललो. आपण देवभूमीत पाय ठेवला आहे याची जाणीव त्याक्षणी झाली. उद्या प्रकाशकाका व ताईंना भेटणार होतो.

सकाळी पाच वाजता उठलो. अतिशय सुंदर बांधलेला हेमलकसा पाहून स्वर्गात आल्यासारखं वाटत होतं. जवळच असलेला त्रिवेणी संगम पाहण्यास गेलो. पाणी फार नव्हते; पण पावसाळ्यात येथे काय निर्सगसौंदर्य असेल याचा अंदाज आला. जाता-जाता प्रकाशभाऊ व मंदाताई

प्राण्यांबरोबर रमलेले डॉ. प्रकाश आमटे

भेटल्या. ते व्यायामासाठी रोज संगमावर चालत जातात. भाऊ व ताईंसोबत 'मॉर्निंग वॉक' करायला मिळाला. यापेक्षा मोठं भाग्य काय असू शकतं? आम्ही आमचा परिचय प्रकाशभाऊंना करून दिला. गप्पा मारत मारत आम्ही प्रकल्पात परत आलो. आवरून आठ वाजता नाष्टा केला व भाऊ आणि ताईंना भेटण्यास गेलो. थोडावेळ त्यांच्या घरी गप्पा झाल्या. त्यांचे प्राणी संग्रहालय पाहायला निघालो. अर्थात प्रकाश काका बरोबर होतेच. माकड, अस्वल, मगर, तरस, साळींदर, हरीण, गरुड, शेकरू व वाघ अशा जंगली प्राण्यांसोबत प्रकाशकाका आरामात खेळतात. आग्या मण्यार, अजगर, धामण अशा सापांना प्रकाशकाकांची नातवंडेसुद्धा (अर्णव, आहन, निर्झर) आरामात हाताळतात. ५ वर्षांचा आहन गळ्यात अजगर घालून मला घाबरवत होता. नागापेक्षा १६ पट विषारी असलेला मण्यार काका सहजगत्या हाताळतात. मोराच्या पिंजऱ्यात काका गेल्यावर मोर पिसारा फुलवून नाचू लागतो. पिसारा फुलवलेला मोर मी एवढ्या जवळून कधीच पाहिला नव्हता. आहन वाघाच्या पाठीवर बसून रपेट मारत होता. शेकरु काकांच्या खांद्यावर येऊन बसतात. हे प्राणी जेव्हा प्रकाश काकांसोबत खेळतात तेव्हा त्यांच्यातला जिव्हाळा आपण स्तब्ध होऊन बघत

सहवासातील मधुर स्मृतींचा गंध उरी दाटतो। या शाळेच्या, या मातीचा कणकण मोहरतो।।

। किल्ले पाहा... विजयदुर्ग - जि. सिंधुदुर्ग - बेलाग व बुलंद जलदुर्ग, वाघोटन खाडीतील आरमारी गोदी प्रसिद्ध।

पाचवी ते नववीसाठी मानसपट मापन - ज्ञान प्रबोधिनी द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे ☎ ०२०-२४२०७१४५



'सर्च' प्रकल्पाच्या कामात व्यग्र डॉ. अभय व डॉ. राणी बंग

राहतो. संग्रहालय पाहून झाल्यावर हेमलकसा प्रकल्प पाहायला गेलो. एकूण ४० एकर जमीनीवर आदिवासी मुलांची शाळा, वसतिगृह, कु कुटपालन, गेस्ट हाऊस, दवाखाना इत्यादी पाहिले. डॉ. दिगंत प्रकाश आमटे हे दवाखाना सांभाळतात व अनिकेत आमटे हे इतर कार्यव्याप सांभाळतात. आपल्यापैकी प्रत्येकानं येथे एकदा तरी आलंच पाहिजे. आमटे कुटुंबीयांचा निरोप घेतला व 'सर्च' शोधग्रामाकडे गाडी वळवली.

डॉ. अभय व डॉ. राणी बंग यांचा हा प्रकल्प. 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' अभय बंग यांचे हे पुस्तक वाचून अंगावर रोमांच उभे राहतात. शोधग्रामामध्ये रोज सायंकाळी सामुहिक प्रार्थना असते ज्यामध्ये स्वत: अभय व राणी बंग असतात. येथे देखील सगळे एकत्र जेवतात.

सकाळी 'सर्च' काय आहे याबद्दल 'संशोधन' करण्यास निघालो. त्यांचा एक कार्यकर्ता बरोबर होता. अप्रतिमरित्या शोधग्राम बांधलेले आहे. आदिवासी लोकांना 'आपल्याच घरी आलो आहोत' असे वाटेल अशी एकूण रचना आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्यास कुट्या आहेत. कुटी एखादया झोपडीसारखी बांधली आहे. गेस्ट हाऊस, दवाखाना, रुग्णालय, संशोधन केंद्र, व्यसनमु ती पीठ, कार्यकर्त्यांची वस्ती, बंग यांचं कार्यालय, घर इत्यादी. एकूण ४५ एकरावर पसरलं आहे. ३० एकर शेती आहे. डॉ. राणी बंग (मॅगेसेस पुरस्कार विजेत्या) यांना भेटलो. अभय काकांना भेटता आले नाही. डॉ. बंग यांना मिळालेले आजपर्यंतचे पुरस्कार पाहिले. हस्तकला प्रदर्शन पाहिले. पण राणी बंग यांनी वेगवेगळ्या आकारांच्या गणपतींचा संग्रह केला आहे. राणी बंग यांचं कार्यदेखील अप्रतिम आहे. राणी बंग यांचे आशीर्वाद घेतले. शोधग्रामचा निरोप घेतला आणि सोमनाथकडे गाडी वळवली.

सोमनाथ येथे आमटे यांची १२०० एकर जमीन आहे. त्यातील ८०० एकर शेती आहे. वेगवेगळ्या भाज्या, पालेभाज्या, फळे, येथे पिकतात. एखादी भाजी लावली तर नजर ठरेपर्यंत तीच भाजी दिसते. येथे पाण्याचा गंभीर प्रश्न आहे म्हणून श्रमदानाच्या माध्यमातून येथे २८ तळी बांधली आहेत. ज्यामध्ये १७ तळी एकमेकांस जोडलेली आहेत. बाबा आमटे यांनी 'जोडो भारत' हे आंदोलन केले व विकास काकांनी 'तळी जोडो' केले. पाणी अडविण्यासाठी जुने, तुटके टायर वापरून हा बंधारा बांधला आहे. जवळपास ५०० टायरचा हा बंधारा आहे व त्याला मजबूत बनविण्यासाठी ७-८ ट्रक प्लॅस्टिक त्यात टाकलं आहे. अशाप्रकारे प्लॅस्टिक सत्कारणी लावलं. त्या टायर्सना सिमेंटचा आधार दिलाय. आज तेथील आजूबाजूच्या परिसरात पाणी नाही, पण सोमनाथमध्ये मुबलक पाणी असते. सोमनाथ येथे दरवर्षी मे महिन्यात 'श्रमदान शिबिर' भरते. यावर्षी १३०० मुलं शिबिरात सहभागी झाली होती. सोमनाथमध्ये मासोळी उत्पादनाचा व्यवसाय आहे. कुष्ठरोग्यांची वस्ती आहे. समाजानं वेशीबाहेर फेकलेल्या याच कुष्ठरोग्यांनी आज सोमनाथ फुलवले आहे. कुष्ठरोगीच शेतीची कामे बघतात. सोमनाथचे व्यवस्थापक हरीकाका बढे यांच्याशी गप्पा झाल्या.

'महारोगी सेवा समिती' या संस्थेचे सचिव विकास आमटे आहेत. आपल्यापैकी प्रत्येकानं किमान एकदा तरी या ठिकाणांना भेट दिली पाहिजे आणि एकदा का तुमचं नातं या प्रकल्पाशी जुळलं, की ते आयुष्यभर अतूटच राहील अशी मला खात्री वाटते.

- चि. श्रीरंग टोके (इ. ९वी)
५, चंद्राई अपार्टमेंट,
तुळशीबागवाले कॉलनी,
सहकार नगर क्र.२, पुणे ४११००९

अन्यायावर करण्या मात, हवा अंगी आत्मविश्वास। ध्येय आपुले गाठण्या, हवी कल्पकतेची साथ।।
। किल्ले पाहा... पूर्णगड - जि. रत्नागिरी, विलोभनीय असे सागराचे दर्शन।

पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन - प्रज्ञा मानस संशोधिका , ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

पाण्यासाठी दाही दिशा !

– रोहन पानसे

महाराष्ट्रात २०१२ मध्ये सरासरीपेक्षा बराच कमी पाऊस पडला. त्यामुळे २०१३ मध्ये दुष्काळ पडणार हे स्पष्टच होते. २०१३च्या जानेवारीपासूनच वृत्तपत्रांमध्ये दुष्काळविषयक बातम्या यायला लागल्या. त्यामध्ये जालना जिल्ह्यातील बातम्या सर्वाधिक होत्या. पहिल्यांदा तलावांचे पाणी आटले. विहिरींचे पाणी संपले. बोअर देखील कोरड्या पडायल्या लागल्या. अशा क्रमाने बातम्या येत होत्या. पुढे पाण्याअभावी स्थलांतरित झालेली गावे वृत्तवाहिन्यांवर दिसू लागली. त्या गावांमधली स्थिती भयानक होती. कामासाठी तरुण व मध्यमवयीन गावकरी शहरात येऊन विस्थापित झाले व गावांमध्ये फ त वृद्ध लोक पाण्याच्या व मदतीच्या आशेने बसून होते.

हे सर्व वाचत असताना, पाहात असताना एप्रिल, मे, जून या महिन्यांमधली स्थिती काय असेल याचा अंदाज येऊ लागला. मार्चमध्ये दुष्काळाने ऊग्र रूप धारण केले. त्यावेळी मन अस्वस्थ झाले. दुष्काळ निवारणासाठी आपण काही काम केले पाहिजे असे प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांना प्रकर्षाने वाटू लागले. आणि मग मार्च महिन्यामध्ये आपण सर्वांनी या कामात उतरायचे आहे असे प्रबोधिनीने ठरवले. दुष्काळाचे वास्तव जाणून घेतल्याशिवाय उपाययोजना करणे श य नव्हते. म्हणून पहिल्या टप्प्यात मराठवाड्यामधील गावांची पाहणी करण्याचे ठरले. लगेच दोन युवक उस्मानाबाद जिल्ह्यात व एक जण बीड जिल्ह्यात प्राथमिक पाहाणीसाठी गेले. त्यानंतरच्या दोन आठवड्यांमध्ये १७ जणांनी उस्मानाबाद, बीड, पुणे जिल्ह्यात डोंगराळ भागात एकूण २६ गावांची पाहणी केली. पाहणी झाल्यावर त्याचे अहवाल तयार केले. त्या सगळ्या अभ्यासाचा परिणाम म्हणजे दुष्काळी परिस्थितीचा आवाका आम्हाला यायला लागला.

दुष्काळाचे पहिले लक्षण म्हणजे पाण्याची कमतरता. पाण्याचा स्रोत म्हणजे पाऊस. या पावसाचे काही पाणी जमिनीत जिरते व ते विहिरींना लागते. काही पाणी हे ओढे, नाले, नद्यांना बांध घालून अडवले जाते. पाऊस कमी झाल्यास पुरेसे पाणी साठत नाही व पाण्याची कमतरता निर्माण होते. ही कमतरता अनेक संकटे बरोबर घेऊन येते.

पावसाअभावी शेतकऱ्याने घेतलेले पीक जळून जाते किंवा शेतकऱ्याला पेरणी करता येत नाही. गावाचे किंवा तालु याचे वार्षिक पर्जन्यमान सरारीपेक्षा ५०%हून कमी झाले व पिकाची पेरणी देखील ५०% हून कमी झाली, तर त्या भागात सरकार दुष्काळ जाहीर करते. सप्टेंबर २०१२ मध्येच महाराष्ट्रातील ११५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून सरकारतर्फे जाहीर केले गेले. महाराष्ट्र राज्य सरकारने ३,०११ कोटी रु.ची मागणी केंद्राकडे दुष्काळ निवारणासाठी केली.

ज्या गावांमध्ये/तालु यांमध्ये सरासरीच्या ५२% किंवा ५५% पाऊस पडला आहे त्या तालु यांमधील स्थिती देखील तितकीच भयानक होती असे पाहाणी करताना जाणवले. कारण तालुका दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर न झाल्याकारणाने सरकारी मदत तेथपर्यंत पोहोचत नाही. उदा. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाईमध्ये सरासरीच्या ५४% इतका पाऊस झाला आहे. इत या कमी पावसात शेतकऱ्यांची पिके काही प्रमाणात जगली. पुरेसे पाणी जमिनीत न मुरल्यामुळे विहिरी आत्ताच आटल्या आहेत. सध्या बोअरला देखील क्षमतेच्या ४० ते ५० ट केच पाणी येत आहे. पुढे ही परिस्थिती अधिकच बिकट होईल.

तसेच धरणात पुरेसा पाणीसाठा नसल्याकारणाने औष्णिक व जलविद्युत वीज निर्मिती दिवसागणिक कमी होते. जी थोडीफार वीज निर्माण होते ती प्राधान्याने शहरांमध्ये पाठविली जाते. परिणामी ग्रामीण भागात सध्या बारा तासाच्या वर तीन फेज वीज नसते. वीज नसल्यामुळे बोअर मधील पंप चालू शकत नाही. शेतीची कामे ठप्प होतात.

दुष्काळाची तीव्रता असणाऱ्या गावांमध्ये जनावरांचे प्रचंड हाल होत आहेत. शेतकऱ्याला स्वत:लाच प्यायला पाणी नसल्यामुळे तो गुरांना पाणी कसे देणार? पिकाअभावी गुरांसाठीचा चारादेखील शेतकऱ्यांकडे उपलब्ध नाही. त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी त्यांची जनावरे रानात सोडून

आम्ही पेरली आमुच्यासाठी स्वप्ने जागोजाग। जिद्द आमुची फुलवायाची फुलाफुलाची बाग।।

। किल्ले पाहा... जीवधन - जि. पुणे - वांदरलिंगी किंवा खडा पारशी हा सुळका प्रेक्षणीय ।

राष्ट्रीय प्रश्नांवर मासिक व्याख्यानमाला - संत्रिका, जनतंत्र उद्‌बोधन मंच, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१८७

दिली आहेत. अशा माळरानांमध्ये चारा थोड्या प्रमाणात उपलब्ध आहे; पण पाणी अतिशय कमी आहे. उदा. उस्मानाबाद जिल्ह्यातील लोहारा तालु यात गेल्या ३-४ वर्षांत सरासरी इतका पाऊस झालेला नाही. त्यामुळे फेब्रुवारी महिन्यापासूनच शेतकऱ्यांनी जनावरं रानात सोडून द्यायला सुरुवात केली आहे व आजपर्यंत अनेक जनावरं पाणी व चाऱ्याअभावी तिथे मृत्युमुखी पडली आहेत.

दुष्काळाचा गंभीर परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर होतो आहे. शेतकऱ्यांनी पीक न घेतल्यामुळे किंवा जे थोडे थोडके पीक आहे ते स्वत:च्या कुटुंबासाठी ठेवल्याने त्या भागात पिकणाऱ्या धान्यांची, भाज्यांची किंमत वाढते आहे. ज्या मोठ्या शेतकऱ्यांकडे पूर्वी साठवलेला पैसा आहे, ते वस्तू चढ्या किंमतीत विकत घेऊ शकतात. पण छोट्या शेतकऱ्यांना ते परवडत नाही. पैसा बाजारात खेळता राहात नसल्याने बाजारात मंदीची छाया पसरली आहे. मूलभूत गरजेच्या असणाऱ्या गोष्टी विकत घेण्यासाठीदेखील सामान्यांकडे पैसा नाही. छोट्या शेतकऱ्यांना रोजच्या व्यवहारासाठी कर्ज घ्यावे लागत आहे. ही कर्जाची र कम उत्तरोत्तर फुगत जाईल. परिणामत: शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त होणेही अश य नाही. किंवा जमिनी जप्त झाल्या नाहीत तरी पुढील पावसात पेरणीसाठी पैसा कोठून येणार? कर्जबाजारी शेतकऱ्यांना नवे कर्ज कोण देणार ?

दुष्काळ निवारणासाठी सरकारी उपाय योजना जाहीर झाली आहे. केंद्राने १२०० कोटी रुपये महाराष्ट्राला दुष्काळ निवारणासाठी दिले आहेत. ते पैसे राज्य सरकारकडे येऊन प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत मात्र पोहोचावे लागतील. २६ गावाचां थोडा अभ्यास करून, पाहाणी करून या बाबी लक्षात आल्या. पण सरकारी बळ पुरेसे पडणार नाही. सर्वांनीच दुष्काळ निवारणाच्या कामासाठी सहभागी व्हायला हवे. अभ्यासावरून जे अहवाल तयार केले गेले; त्यावरून आपल्याला दोन प्रकारची कामे करायला हवीत; असे प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांना जाणवले. सर्वात प्रथम म्हणजे पुढील तीन महिन्यांसाठी दुष्काळग्रस्तांपर्यंत तात्काळ मदत पोहोचली पाहिजे. **त्यासाठी –**

१. माणसांना व गुरांना पिण्यासाठी पाण्याची सोय करणे.
२. पाणी साठवणूकीसाठी गरजेप्रमाणे हौद बांधणे.
३. गुरांसाठी चारा उपलब्ध करून देणे.
४. ज्या गावांमध्ये गढूळ व दूषित पाणी उपलब्ध आहे तेथे पाणी शुद्धीसाठी पाण्याचे फिल्टर पुरवणे इ.

पण या गावांमध्ये पुन्हा दुष्काळ पडणार नाही यासाठी ठोस काम करायला हवे. **जसे की –** १. शोषखड्डे खणून बोअर व विहिरींचे पुनर्भरण करणे. २. शेततळी, विहिरींमधील गाळ काढणे. ३. विहिरींची खोली वाढविणे. ४. पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन (rain water harvesting) ही संकल्पना व त्याचे महत्त्व गावांमध्ये पोहोचविणे. ५. गावांमधील तरुणांना पाणलोट क्षेत्र विकास, जल साक्षरता, पाणी व्यवस्थापन इ. गोष्टींचे प्रशिक्षण देणे व गावात त्याबाबत जाणीव जागृतीचे कार्यक्रम करणे.

वरील दोन्ही प्रकारची कामे करताना एक मुद्दा सर्वांत महत्त्वाचा आहे. जी जी कामे आपण या गावांमध्ये करू त्यामध्ये गावकऱ्यांचा कृतिरूप सहभाग असायला हवा. या सहभागाचे दोन परिणाम अपेक्षित आहेत. पहिला म्हणजे झालेली कामे अधिक काळ टिकण्यासाठी त्यात गावकऱ्यांचा सहभाग अनिवार्य आहे. त्यातूनच बंधारे, फिल्टर याची काळजी गावकऱ्यांनीच घेतली पाहिजे. दुसरे महत्त्वाचे म्हणजे, दुष्काळ निवारताना 'आम्ही स्वत:चा दुष्काळ स्वत:च मिटवू,' असा आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न प्रबोधिनी गावकऱ्यांमध्ये करते आहे.

हा लेख लिहून होईपर्यंत, पाहणीचे काम संपले असेल व प्रत्यक्ष कामाचे नियोजन सुरू झाले असेल. काही ठिकाणी श्रमकार्ये सुरूही झाली आहेत. ज्ञान प्रबोधिनीतर्फे निधी संकलनालाही सुरुवात झाली आहे. मे, जून व प्रत्यक्ष पाऊस पडेपर्यंत या कामाची गरज वाढत जाणार आहे, हे निश्चित. वर दिलेली कामे ज्ञान प्रबोधिनीतर्फे १५ गावांमध्ये करायचा संकल्प सोडला आहे.

दुष्काळ निवारणाच्या कामाला अधिक गती येण्यासाठी आपणही प्रबोधिनीबरोबर या सर्व कामात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी होऊ शकता. त्या-त्या गावांमध्ये जाऊन श्रमस्वरूपात अन्यथा निधीच्या स्वरूपातही आपण आपली मदत दुष्काळग्रस्तांपर्यंत पोहोचवू शकता. आपल्या सक्रीय सहभागाचे स्वागत आहे.

रोहन पानसे
ज्ञान प्रबोधिनी, युवक विभाग, पुणे - ३०
☎ 8007346238

निरक्षर कोणी नसो, साक्षरतेची बात करा। ज्ञानाविना फोल माना, मंत्र जीवनी हा स्मरा ।।

। किल्ले पाहा... हडसर, पर्वतगड - उंची ४६८७ फूट, जि. पुणे, खडकात खोदून काढलेले अप्रतिम प्रवेशद्वार ।
'उमलत्या' वयाशी जुळवून घेताना (लैंगिकता शिक्षण व जाणीव संवर्धन) - संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

पराक्रमाच्या कृती घडविण्या, जिद्द मनी जागवू। किरणशलाका होवून जगती, ज्ञानदीप चेतवू।।

। लेणी पाहा... नाणेघाट - जुन्नर, जि. पुणे, इ. स. पूर्व पहिले ते इ. स. दुसरे शतक, शिलालेख, पहिले तसबिर शिल्प ।

सहभागी व्हा ! मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल - युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४

उद्या रात्री गल्ली नंबर ८,
आसावरी बंगला, कोरे कॉलनी
त्या माणसाचा शोध घेण्यासाठी अभिराम, प्रसाद ओंकारेश्वर मंदिराजवळ भरणाऱ्या कबुतरांच्या बाजारात आले होते.
अभ्या, कस्सली मस्त–गुबगुबीत कबुतरं आहेत ना रे?
कबुतराच्या गळ्यातला तो पत्ता.., त्या माणसाचं कबुतराविषयी विचारणं... न की काहीतरी गडबड आहे !
त्याचवेळी, पलीकडून कुजबूज...
भोला, मी ते कबुतर खूप शोधलं पण ते कुठे गेलं, कोणास ठाऊक?
शंकर ! मग आता आपण काय करायचं?
ठरल्याप्रमाणेच...! आज रात्री कोरे कॉलनी कळलं?
शंकरनं पुढचा प्लॅन भोलाला सांगतांना अभीनं तो ऐकला.

सुरेख लेखना, उदंड वाचना। स्फूर्ती घेऊया, या यशाकडेच जाऊ या।।

। लेणी पाहा...बेडसे - कामशेत, जि. पुणे इ.स.पूर्व पहिले शतक, कोरीव स्तंभ, नृत्य करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या प्रतिमा।

NTS मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण - बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१९४

चित्रकार – गिरीश सहस्रबुद्धे, 1000scape@gmail.com **ले. – ईशान पुणेकर**, १५५, रास्ता पेठ, पुणे 411011

क्षितिज मोकळे तुझ्या पराक्रमास केवढे। मनात धैर्य ठेवूनी झेप घे पुढे पुढे।।

। लेणी पाहा...गणेश लेणी - लेण्याद्री, जुन्नर, जि. पुणे. इ. स. पहिले शतक. विहारातच 'गिरीजात्मज' गणेशाची मूर्ती।

UPSC परीक्षा पूर्वतयारी वर्ग - स्पर्धा परीक्षा केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

निर्णयाचे स्वावलंबन म्हणजे जीवनाचे स्वावलंबन

– वाच. उषा खिरे

लेखांक – ५

तुमच्या परीक्षा नुकत्याच संपल्या आहेत. मुलांनो, परीक्षेची पूर्वतयारी करताना तुम्ही काय काय केले? वर्षभर अभ्यास करताना तो विषय नीट समजून घेतला असेल. स्वत: टिपणे काढली असतील, तर तो विषय अधिक कळतो; हे काही जणांच्या लक्षात आले असेल. केवळ गाईडस् वाचून, निव्वळ पाठांतर करून, बहुपर्यायी प्रश्नांना अंदाजे उत्तरे ठोकून, एखाद्या परीक्षेत मिळालेल्या यशाने पुढील अभ्यासाची क्षमता विकसित होत नाही. निर्णयाच्या स्वावलंबनाचेही असेच आहे. दैनंदिन आयुष्यातील लहान मोठे निर्णय आपण कसे घ्यायचे, हे आपण शिकत गेलो तरच आपली निर्णय क्षमता विकसित होते.

निर्णय क्षमतेवर बरेच संशोधन झाले आहे. ज्ञान प्रबोधिनीतही प्रज्ञा मानस संशोधिकेत शालेय विद्यार्थ्यांच्या निर्णय क्षमतेवर अभ्यास करून कसोटी तयार केली आहे. या अभ्यासात एक महत्त्वाची गोष्ट आढळली; निर्णय घेताना प्रसंग कळणे व नेमका प्रश्न समजणे, आणि नंतर पर्याय निवडून कृती करणे हे दोन स्वतंत्र घटक आहेत. प्रसंग समजण्यासाठी वैचारिक क्षमता अधिक लागते. पर्याय निवडताना व कृती करताना स्वभावाचा आणि व्य तिमत्त्वाचा परिणाम अधिक असतो. पर्याय निवडताना धोका स्वीकारायचा किंवा नाही, हेही स्वभावावर ठरते. निर्णय घेताना भावनिक स्थैर्य, स्वनियंत्रण व धाडस या गुणांचा अनुकूल परिणाम होतो, तर ताठरपणा किंवा सतत चिंता यांचा प्रतिकूल परिणाम होतो. या वयात महत्त्वाचे निर्णय यशस्वीरित्या कसे घेता येतात, याचे काही नमुने पाहूयात.

सध्या ज्ञान प्रबोधिनीत 'दहावीनंतर काय?' हे ठरवण्यासाठी अनेक विद्यार्थी 'ॲप्टिट्यूड टेस्ट' देतात व मार्गदर्शन घेतात. यात काहीवेळा मुले अन्य प्रभावाखाली, कोणत्यातरी आकर्षणामुळे किंवा आईवडिलांच्या दडपणामुळे अभ्यासक्रमाची निवड करतात. स्वत:च्या क्षमता, आवड आणि आपले व्य तिमत्त्व समजून घेतल्यावर, त्या अभ्यासक्रमाविषयीची आधिक माहिती घेतल्यावर मात्र, काही जणांचा विचार बदलतो. आपल्या स्वत:ला निर्णयाचे स्वावलंबन असले तरी इतरांचे मार्गदर्शन घेणे उपयु त असते. त्यात कोणतेही परावलंबन नाही.

हे लिहीत असताना मला बऱ्याच वर्षांपूर्वीचे दोन विद्यार्थी आठवतात. शालान्त परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेला नितीश अभियांत्रिकीला गेला. आपल्याला हा अभ्यासक्रम फारसा आवडत नाही, हे त्याला कळत होते; पण वृत्ती अभ्यासू होती. त्याकाळची हुशार मुले अभियांत्रिकीची निवड प्रथम करत. त्याप्रमाणेच नितीशने केले; परंतु प्रथम वर्षालाच तो नापास झाला. लगेचच त्याने विचारपूर्वक कलाशाखेला प्रवेश घेतला. पदवीनंतरच्या शासकीय अधिकाऱ्यांच्या स्पर्धा परीक्षेत, त्याने उत्तम यश मिळवले आणि भारताच्या परराष्ट्र खात्यात तो उच्चपदावर पोचला (IFS).

दुसरा विद्यार्थी स्वानंद, नेहमी प्रथम किंवा उत्तम श्रेणी मिळवणारा. तोही काही कारणाने त्यावर्षी नापास झाला; पण त्याला अभियांत्रिकीची तीव्र आवड होती. काही जणांनी अभ्यासक्रम बदलण्याचा सल्ला त्याला दिला. तो न मानता त्याने नैराश्य झटकून परीक्षेची तयारी कशी करायची, याचा सराव केला व अभियांत्रिकीचा पदव्युत्तर अभ्यासक्रमही यशस्वीरित्या पूर्ण केला.

या दोन्ही विद्यार्थ्यांच्या बाबत काय दिसते? त्यांनी स्वत:ला जाणून घेतले. आपल्याला काय करायचे, काय हवं आहे याबाबत त्यांनी प के ठरवले होते. अपयशाचे खापर इतरांवर न फोडता, त्यांनी स्वत:मध्ये आवश्यक ते बदल केले. त्यामुळे घेतलेल्या निर्णयानुसार वाटचाल करण्याचा आत्मविश्वास त्यांना मिळाला.

काहीवेळा एखादा निर्णय चुकू शकतो. अशावेळी

निर्णय घेताना झालेली विचारातील गफलत कळून घ्यायला हवी, निर्णयाची कार्यवाही करण्यासाठीची तजवीज करताना काय आणि कुठे कमी पडले हे जाणून घ्यायला हवे. या बाबींवर आपण विचार करतो का? 'माझा निर्णय बरोबरच होता, मात्र तो राबवताना दुसऱ्याने चूक केली' असेच आपल्याला वाटते. वास्तविक निर्णयातील चुकीची जबाबदारी स्वीकारणे, हेही निर्णयाच्या स्वावलंबनाचे लक्षण आहे.



प्रज्ञा ही नववीतील विद्यार्थिनी. स्पर्धेसाठी परगावी गेली होती. शनिवारी स्पर्धा संपल्यावर रविवारी परत यायचे होते. प्राचार्यांची पूर्ण परवानगी होती. सोमवार पासून परीक्षा होती. अभ्यास झालेला होता. पुण्यातल्या तीन शाळांतील विद्यार्थिनी एका खाजगी बसने गेल्या होत्या. सर्वांबरोबर एकच मार्गदर्शक ताई होत्या. सर्व स्पर्धा शनिवारी दुपारपर्यंत संपल्या. प्रज्ञाला वाटले आजच परत जाता आले, तर विश्रांती मिळून रविवारचाही दिवस परीक्षेच्या तयारीसाठी मिळेल; परंतु ताईंना काही कामे होती, त्यामुळे त्या व त्यांचा गट तिथेच थांबणार होता. प्रज्ञाने तिच्या शाळेतील मैत्रिणींना घरी लवकर जाण्याची कल्पना सांगितली. त्या काळी मोबाईल नव्हते. STD बूथ वरून तिनं घरी फोन केला. सर्व मैत्रिणींची नावं व फोन नंबर दिले. दर २ तासांनी बस होती. त्वरा करून गटातील दोघीजणी स्टँडवर गेल्या. आरक्षणे केली. हे करताना त्या मुलींसमोर काही प्रश्न होते. अचानक आदल्या दिवशी मुली परतल्या आणि पालक त्यावेळी घरी नसले तर? पालक स्टँडवर आणायला आले नाहीत तर? गाडी पोचायला उशीर झाला तर? या सर्व प्रश्नांवर त्या मुलींनी उपाय शोधून ठेवले. गाडीत बसण्यापूर्वी पुन्हा एकदा घरी कळवले. एकमेकांना विचारत, पालकांशी बोलून, प्रज्ञाने स्वत:बाबत व गटाबाबत निर्णय घेतला. येथे निर्णयात थोडेसे धाडस होते; परंतु प्रसंगाचा व पर्यायांचा विचारही होता. केवळ घरच्या ओढीने भावनाप्रधान होऊन घरी लवकर परतणे, एवढेच नव्हते.

असाच एक प्रसंग आठवतो. एकदा सहलीला गेल्यावर एकमेकांच्या नादाने काही मुले पोहायला जातात. त्यातील एका मुलाने अनाठायी केलेले साहस त्यांच्या अंगलट येते. तो मुलगा त्याचा जीव गमावतो. येथे त्या मुलाने आपल्या क्षमता न ओळखता निर्णय घेतला होता. येथे कृतिबाबतचा अपुरा विचार व फाजील आत्मविश्वास, त्याने घेतलेल्या निर्णयाला मारक ठरला.

तुम्ही थोरामोठ्यांची चरित्रे वाचता ना? ही माणसे तुमच्या वयाची असताना काय करत होती? कसे निर्णय घेत होती? सध्याच्या काळातील निरनिराळ्या क्षेत्रातील विक्रमवीर असो किंवा स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक वंदनीय व्य ती असो! प्रतिकूलतेवर मात करत होणाऱ्या प्रत्येक संधीचा उपयोग करीत, त्यांचा प्रवास झालेला दिसतो. उदा. शैक्षणिक समाजिक सुधारणांसाठी जीवन व्यतीत केलेले गोपाळ गणेश आगरकर तुम्हाला माहीत आहेत? त्यांचे बालपण खूपच हलाखीत गेले. मामाकडे राहून काही शिक्षण त्यांनी पूर्ण केले. बाराव्या वर्षीच मामलेदाराकडे नोकरी धरली; पण त्यांना शिक्षणाची विलक्षण ओढ होती. पूर्ण वेळची नोकरी सोडण्याचा त्यांनी निर्णय घेतला. अधूनमधून काम करत, प्रसंगी कधी माधुकरी मागत त्यांनी आपले शिक्षण चालूच ठेवले. पुढे मुलांच्या शिकवण्या घेत त्यांनी एम.ए. पूर्ण केले. 'विशेष संपत्ती व सुखाची हाव न धरता पोटापुरतेच मिळवणार,' असे आईला सांगितले. पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल, फर्ग्युसन महाविद्यालय या संस्थांच्या स्थापनेत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. आगरकरांनी बाराव्या वर्षीच कितीही अडचणी आल्या तरी शिक्षण पूर्ण करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. असे निर्णय घेणारे धुरीण

। लेणी पाहा... भांबुर्डे, पाताळेश्वर - पुणे, इ. स. सहावे शतक, गुंफेत मध्यभागी शिवलिंग व नंदी मंडप प्रेक्षणीय।
सहभागी व्हा, अनुभव घ्या - सुट्टीमधील जोडीकार्ये - छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१७४

थोड यात काय लक्षात ठेवायचं?

- निर्णयाचे स्वावलंबन म्हणजे मनात येईल ते करणे, असे नव्हे.
- योग्य निर्णयासाठी नीट विचार करता येणे व त्याचबरोबर मन स्थिर असणे आवश्यक असते.
- एखादा निर्णय चुकू शकतो, हे स्वीकारून बदल करणे हेही स्वावलंबनच आहे.
- स्वत: विचार करून निर्णय घेण्याच्या सवयीने निर्णय क्षमता विकसित होते. त्यातून आपण स्वत:ला घडवू शकतो.

देशाच्या बाबतीतही धाडसी व योग्य निर्णय घेऊ शकतात. निर्णयाचे स्वावलंबन म्हणजे खरेच काय असू शकते, हे अशा गोष्टीतून कळते.

काही उदाहरणं तर अतिशय टोकाची असतात. तुमच्या फारसे वाचनात नसलेले एक उदाहरण सांगते. पंडिता रमाबाई सरस्वती (डोंगरे) या अशाच एकोणिसाव्या शतकात स्त्रीशिक्षणासाठी व स्त्रियांचे जीवन सुधारण्यासाठी लढा देणाऱ्या मोठ्या विदुषी, सामाजिक कार्यकर्त्या ! त्यांच्या वडिलांनी स्त्रियांना संस्कृत शिकवण्याचा निर्णय घेतला. घरचा विरोध टाळण्यासाठी मंगरुळजवळ डोंगरावर दाट अरण्यात वस्ती करून त्यांनी गुरुकुल चालवले. अनेक विद्यार्थ्यांना धर्मशास्त्र, काव्य, व्याकरण शिकवले. भयंकर दुष्काळ पडल्यावर डोंगर सोडून त्यांनी भारतभर यात्रा सुरू केली. यात्रेच्या काळातच रमाबाईंचे वडील, आई व बहीण यांचे निधन झाले. बहिणीच्या अंत्यविधीसाठी भावाबरोबर रमाबाईनेही खांदा दिला. संस्कृत विद्येच्या प्रसारासाठी व देवाच्या मूळ कल्पनेचा शोध घेण्यासाठी पायी प्रवास करण्याचा निर्णय प्रतिकूल परिस्थितीतही त्या भावंडांनी घेतला. त्यासाठी प्रसंगी मोलमजूरीही केली. त्यांचा हा सगळा अनुभव वयाच्या १८ ते २० वर्षापर्यंतच्या आयुष्यातला. केवळ धर्मशास्त्राचा अभ्यास पुरेसा नाही हे रमाबाईंनी ओळखले. स्त्री शिक्षणासाठी चळवळ उभी केली पाहिजे, हे लक्षात घेऊन रमाबाईंनी प्रथम स्वत: विविध भाषांचा अभ्यास केला. पुढे त्यांनी कोलकत्याला राहून काम करायचे ठरवले. अधिक ज्ञानासाठी कोलकत्यात आल्यावर रमाबाईंनी 'प्राचीन काळातील प्रतिष्ठित स्त्रीजीवन,' यावर संस्कृतमधून व्याख्याने दिली. त्यानंतर त्यांच्यावर स्त्रीशिक्षणाची जबाबदारी टाकली गेली. 'पंडिता' व 'सरस्वती' या पदव्या त्यांना मिळाल्या होत्या.

निर्णयातील स्वावलंबन मिळण्याकरता व ते टिकवण्याकरता इतर अनेक बाबतीतही स्वावलंबी व्हावे लागते. सारासार विचार करून घेतलेल्या निर्णयानुसार आपल्याला खंबीरपणे वाटचाल करावी लागते. आपल्याबरोबर इतरांनाही घ्यावे लागते. 'शिकायचे कसे' हे एकदा अवगत केले, की इतरांचे मार्गदर्शन घेऊन पुढे जाता येते. स्वत:च्या क्षमतांवर विश्वास असेल, तर प्रतिकूलतेवर मात करत जीवनावश्यक निर्णय घेता येतात.

– वाच. उषा खिरे
प्रज्ञा मानस संशोधिका,
ज्ञान प्रबोधिनी, ५१४, सदाशिव पेठ, पुणे ३०

छात्र प्रबोधनतर्फे मुलांसाठी गिरिभ्रमण सहल
गोरखगड–सिद्धगड–भीमाशंकर
'कणखर देशा, राकट देशा, दगडांच्या देशा',
हे महराष्ट्राचे वर्णन प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी
डोंगरदऱ्यांमध्ये भटकायला या...!

कालावधी	:	१ ते ४ जून २०१३
वयोगट	:	८ वी ते १० वी, मुले
नोंदणी	:	२५ मे २०१३ पर्यंत
शुल्क	:	८००/–
संपर्क	:	छात्र प्रबोधन, पुणे २४२०७१७४/१०६

मुलींसाठीही मे अखेरीस ३ दिवसांची सहल असणार आहे. इच्छुकांनी संपर्क साधावा.

'छात्र प्रबोधन' हे कुमारांसाठी असलेले मराठी बाल-कुमार साहित्य विश्वातील महत्त्वाचे मासिक आहे. प्रथम अंकापासूनच 'छात्र प्रबोधन'चे अंक दर्जेदार आहेत. यामागे जे संपादक मंडळ आहे, त्याचे भरपूर परिश्रम आहेत. संपादक मा. श्री. महेन्द्र सेठिया यांच्याकडे मुलांविषयीची निश्चित ध्येये किंवा स्वप्ने (vision) आहेत. 'छात्र प्रबोधन'मध्ये ज्ञान, विज्ञान, मनोरंजन असा त्रिवेणी संगम साधला आहे. 'छात्र प्रबोधन'ने आजपर्यंत अनेक उपक्रम राबवले आहेत. 'तुम्हीच संपादक व्हा!- हस्तलिखित स्पर्धा, सृजनाला पंख नवे!' या स्पर्धा मुलांना कार्यरत ठेवण्यात आणि त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यात यशस्वी झाल्या आहेत. ग्रामीण दिवाळी अंक, इंग्रजी दिवाळी अंक, बोलका दिवाळी अंक तसेच ब्रेल लिपीतील दिवाळी अंक ही 'छात्र प्रबोधन'ची खास वैशिष्ट्ये. 'छात्र प्रबोधन'ने अंकात प्रसिद्ध होणाऱ्या निवडक साहित्याचे संकलन करून त्याची पुस्तके प्रकाशित केली आणि मराठी साहित्य समृद्ध केले.

मी 'छात्र प्रबोधन'मध्ये सुरुवातीपासून अत्यंत आत्मीयतेने भरपूर लेखन केले. हा आत्मभाव सर्व संपादक मंडळ आणि मा. श्री. महेन्द्र सेठिया यांमुळे कायम वर्धिष्णू राहिला. 'छात्र प्रबोधन'ला खूप खूप शुभेच्छा!

– वाच. लीला दीक्षित,ज्येष्ठ लेखिका, पुणे

✻

माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'

छात्र प्रबोधन
२० वर्षांची वाटचाल

गेली कित्येक वर्षे मी 'छात्र प्रबोधन' मासिक वाचते आहे. या मासिकासाठी बरेचदा कथा, लेख तसेच लेखमाला लिहिण्याची संधीही मिळाली. ही संधी म्हणजे अर्थातच माझ्या आनंदाचा विषय होता; कारण 'छात्र प्रबोधन' हे केवळ मुलांसाठीचे सामान्य मासिक नाही, तर चांगली वाचन-संस्कृती घडावी तसेच 'राष्ट्राच्या हितासाठी आपण काय काय करू शकतो,' हा विचार जागृत ठेवणारी चळवळ आहे. यासाठी मासिकाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाचे अतिशय मोलाचे कार्य घडते आहे.

– वाच. सुरुचि पांडे, लेखिका, पुणे

✻

मराठी भाषेमध्ये मासिकांची मोठीच परंपरा आहे. पण सध्याच्या टीव्ही व टॅब्लेटच्या जमान्यात ती परंपरा खंडित होऊ लागली आहे. मुलांसाठी अतिशय मोजकीच मासिके आहेत. चांगल्या साहित्याची वानवा आहे. त्यामुळे एखाद्या चळवळीसारखे चालवले जाणारे, वैविध्यपूर्ण, श य त्या सर्व साहित्यप्रकारांचा समावेश करणारे, वाचक व कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरणारे, कृतिप्रवण, उपक्रमशील असे 'छात्र प्रबोधन' हे मासिक उजवे आहे. अशा पद्धतीचे मासिक प्रकाशित करणाऱ्या 'छात्र प्रबोधन'च्या सर्व गटाचे – एकूण परिवाराचे व वाचकवर्गाचेही खूप कौतुक आहे. 'छात्र प्रबोधन'चे महत्त्व वाळवंटातल्या ओॲसिस्सारखे वाटते. अंक मोठा करावा ही विनंती !

– ईशान पुणेकर, लेखक, पुणे

✻

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ वैशाख, शके १९३५, १ मे २०१३ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

१

२

३

सौंदर्यपूर्ण शिल्परचना

४

५

१) वेरुळ लेणीतील सभामंडप
२) सारनाथ येथील बुद्ध
३) वेरुळ येथील भिंतीवरील देवदेवतांची शिल्पे
४) तंजावर येथील नटराजाची मूर्ती
५) वेरुळ येथील छताची वैशिष्ट्यपूर्ण रचना
६) वेरुळ येथील कैलास लेणे

६

(तपशीलासाठी अंकातील पान क्र.६ वरील लेख वाचा.)

सौर वैशाख, शके १९३५/ मे २०१३, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNINO.)MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

सौर दिनदर्शिका
शके १९३५

मे २०१३		वैशाख ज्येष्ठ
बु.	1	११
गु.	2	१२
शु.	3	१३
श.	4	१४
र.	5	१५
सो.	6	१६
मं.	7	१७
बु.	8	१८
गु.	9	१९
शु.	10	२०
श.	11	२१
र.	12	२२
सो.	13	२३
मं.	14	२४
बु.	15	२५
गु.	16	२६
शु.	17	२७
श.	18	२८
र.	19	२९
सो.	20	३०
मं.	21	३१
बु.	22	ज्ये.१
गु.	23	२
शु.	24	३
श.	25	४
र.	26	५
सो.	27	६
मं.	28	७
बु.	29	८
गु.	30	९
शु.	31	१०

बिंब... प्रतिबिंब...

नदी, तलाव, किल्ल्यांवरील तळी यांच्या काठावर अशी दृश्ये टिपताना प्रकाश, त्याची दिशा, पाण्याची स्थिरता आणि चित्राची चौकट नेमकी पकडता यायला हवी. त्यासाठी कधीकधी वाटही पाहावी लागते. तुम्ही काढलेली अशी चित्रे जरूर पाठवा. –महेन्द्र सेठिया, jpmahen@gmail.com

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
या अंकाची किंमत : ₹ १५/–
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/–
प्रकाशन दिनांक :
सौर ११ वैशाख, शके १९३५
१ मे २०१३
www.chhatraprabodhan.org
ई–मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति –